नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १५९ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शहा धोकादायक, ते दुर्योधन-दुःशासनासारखे..

ममतांचा संताप



■ वृत्तसंस्था, तिरुपती, दि. ११ :
पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना धोकादायक म्हटले आहे. ममता यांनी सभेत सांगितले की, शहा यांच्या डोळ्यात दहशत आहे. त्यांच्या एका डोळ्यात तुम्हाला दुर्योधन तर दुसऱ्या डोळ्यात दुःशासन दिसेल.
ममता यांनी स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन संदर्भात महिलांना सांगितले, केंद्र सरकार एसआयआरच्या नावाखाली माता-भगिनींचे अधिकार हिरावून घेतील. ते निवडणुकीदरम्यान दिल्लीतून पोलिस बोलावतील.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# हजारेंना जाग आली

आपले थोर समाजसेवक अण्णा हजारे हजार ते दोन हजार दिवसांनी जागे होतात. त्यांचा उद्देश वाईट नसतो पण अण्णांना त्यांच्या आजूबाजूचे अनेक ठग्गू अण्णा वापरून घेतात, आपली कामे करून घेतात, हळूच त्यांना वाऱ्यावर सोडून देतात आणि मग अण्णा हजारे कोण आहेत, असे विचारत असतात. २०१२ साली अण्णांच्या अवतीभवती काही महान मंडळी जमली होती, त्यांनी अण्णांना पटवले, उपोषणाला बसवले आणि त्यामध्ये आपले घोडे सुद्धा घुसवले. खरे तर त्यांना उपोषणाद्वारे हुतात्मा करण्याचाही विचार होता असे काही लोक बोलतात. खरेखोटे बोलणारे जाणोत किंवा अण्णा हजारे जाणोत कारण या गोष्टीला आता एका तपापेक्षा जास्त काळ निघून गेला आहे. केजरीवाल यांच्यासारखे अनेक चेले राजकारणातील उदय पाहून अस्ताकडे चाललेले आहेत. अण्णांना जे हवे होते ते अजून काही झालेले नाही हेही खरे आहे. आता त्या काळात अण्णांचा उपयोग करून जे जे सत्तेवर आले. त्यांनाही अण्णांच्या सर्व मागण्या मान्य करणे शक्य झाले नाही त्यांच्या लेखी अण्णा हे फक्त बुजगावणे आहे. आता अण्णा स्वयंप्रकाशाने तळपू इच्छितात. आता त्यांना कोण कोण साथ देईल, कोण कोण त्यांच्या मागे येतील हे आम्हाला ठाऊक नाही. पण आता अण्णा ३० जानेवारी २०२६ पासून राज्यात सशक्त लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी अहिल्यानगर मधील राळेगणसिद्धी मधील यादव बाबा मंदिरात उपोषणाला बसणार आहेत, याबाबत त्यांनी चक्क मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून इशारा दिला आहे. त्यातच लोक आयुक्त सुधारणा विधेयक आजच विधिमंडळाच्या दोन्ही सभरात मंजूर करण्यात आल्याची बातमी सुद्धा आहे. आता उद्या अण्णांची भूमिका काय असेल हे आपण पाहूच. मात्र अण्णांचा उद्देश कधीच वाईट नसतो कारण त्यांना काही कमवायचेही नाही आणि त्यांच्याजवळ गमावण्यासारखे काही नाही. थोडक्यात कोणत्याही प्रकारचा व्यक्तिगत स्वार्थ नसलेला हा माणूस या देशात अनेक नव्यानव्या गोष्टींना उजाळा देऊन गेला हे मान्य करावे लागेल. विशेष म्हणजे आपल्या अण्णा हजारे जागे झाले ही सर्वसामान्य जनतेला असामान्यपणे सुखावणारी बाब आहे. खरे पाहायला गेले तर अण्णांमुळेच माहितीचा अधिकार आला, त्यांच्यामुळेच त्यांनी आरोप केलेल्या अनेक मंडळींना घरी बसावे लागले. त्याच अण्णांमुळे आज आम आदमी पार्टी आणि भारतीय जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले हे कोणीही अमान्य करणार नाही. आता अण्णांनी जी घोषणा केली. ती निश्चितच सुखावणारी आहे पण २०१२ साली जो माहोल तयार झाला होता तो २०२६ सालात होईल काय, हा आमचा प्रश्न आहे. आता यमुनेतून बरेच पाणी वाहून गेलेले आहे, लोकांचे विचार बदललेले आहेत, सरकार बदललेले आहे. सरकारची काम करण्याची पद्धती बदलली आहे. अशा परिस्थितीत अण्णांनी घेतलेला हा निर्णय त्यांना अंमलात आणावयाचा असेल तर तो द्राविडी प्राणायाम करायला केजरीवाल, किरण बेदी, महावकील प्रशांत भूषण, महाकवी कुमार विश्वास त्यांच्यासारखे साहित्यिक आणि बाबा रामदेव वगैरे सारखे संत महंत अण्णांच्या मंडपात भाषणगिरी करतील काय, असे बरेच प्रश्न आहेत. अन्यायासाठी उपोषण कोणत्या पवित्र स्थानी होणार आहे हे अजूनही अण्णांनी जाहीर केले गेलेले नाही. मात्र अण्णांना राजधानी दिल्लीमध्ये उपोषण करून दिले जाईल काय यासारखे असंख्य जटील प्रश्न आमच्या डोळ्यासमोर पंजाबी भांगडा नृत्य करीत आहेत. अण्णांच्या या भविष्यकालीन आंदोलनाची आम्ही आमच्याच डोळ्यात तेल घालून वाट पाहत आहोत. अण्णांनी आपला हा निर्धार प्रत्यक्षात उतरवून दाखवावाच असे आम्हा पामरांचे आवाहन आहे. अण्णा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, वाह व्वा क्या बात है!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# दुःखितांचे अश्रू पुसणार तरी कोण?

## ३० हजार आंदोलकांना प्रशासनाने धरले वेठीस सरकारचे बंदीस्त अधिवेशन कुणासाठी?



: अधिवेशन रिपोर्टज :
संदीप काळे

■ नागपूर, दि. ११ :
आपली दोन वेळची चूल पेटावी यासाठी नागपूर अधिवेशनात मायबाप सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आलेल्या तब्बल ३० हजार आंदोलक गरीब कष्टकऱ्यांची थट्टा सरकारने केल्याचे पाहायला मिळाले. ना कोणती व्यवस्था, ना कोणी विचारायला आले, आंदोनकर्त्या महिलांची अवस्था तर डोळ्यात अश्रू आणणारी होती.

नागपूर येथे सुरू असलेल्या राज्य अधिवेशनात आज राज्यभरातून ४२ मोर्चे, ४९ धरणे, यात सहभागी असणारे ३० हजारावून अधिक आंदोलनकर्ते यांची झोप उडाली आहे. आज दुपारी १२ नंतर यशवंतराव चव्हाण स्टेडियमवर जे काही चित्र होते ते चित्र पाहून कुणाचाही थरकाप उडेल असे ते चित्र होते.

स्टेडियमवरच्या एका कोपऱ्यात आपल्या तीन वर्षाच्या मुलीला स्तनपान करण्यासाठी एकांत मिळेल याची वाट पाहणाऱ्या शिवानी जाधव यांना एकांत मिळत नव्हता, बाळ जोरात रडत होते आणि शिवानी यांच्या चेहऱ्यावरची काळजी वाढत होती.

बाळ शांत झाल्यावर शिवानीला बोलते केल्यावर त्या म्हणाल्या, मी सातारा येथून आले. कशाचे आंदोलन दादा, तुम्ही कंत्राटी कामगार आहात तुम्ही कायम होणार, आंदोलनाला या असे सांगितले, आम्हाला येवून तीन दिवस झाले पण सरकार दरबारी अजून कोणीच आले नाही. आम्हाला ज्या नेत्याने १ हजार रुपये फीस घेवून बोलवले त्यांचा ही पता नाही. माझ्यासोबत आलेल्या अर्ध्या महिला येथे बाथरूमची व्यवस्था नाही म्हणून परत गेल्या.

पाचशे माणसाचा पेंडॉल आणि माणसे आली १५ हजार कसे नियोजन लागेल? आमच्या दोघांचे संभाषण एकूण परभणीहून आलेल्या शिक्षक ताराबाई गोंड म्हणाल्या मागच्या दोन रात्री आम्ही रस्त्यावर काढल्या नेते या म्हणतात, व्यवस्था करतो म्हणतात आणि येथे आल्यावर कळते की रस्त्यावर झोपायचे आहे. प्रचंड थंडी, पाणी पिण्याची सोय देखील नाही. मी उसणे पैसे घेऊन आले, आणि सर्वांमध्ये हीच चिंता आहे एकच गाडी आहे, वापस जाणे आता शक्य नाही.

ग्रंथालयाच्या मागणीसाठी आलेल्या सुमनबाई पवार म्हणाल्या, चार दिवसात कुणीतरी विचारायला आले पाहिजे होते, कुणी आले नाही. यशवंत स्टेडियम ज्या उद्देशाने बांधले असावे तो उद्देश आज प्रचंड वेदने मध्ये रुपांतरीत झाला होता. सर्व महिला, पुरुष इंचभर धुळीवर उन्हाचे चटके शोषत उराशी स्वप्न बाळगून होते. अधिवेशन पासून तीन किमी अंतरावर उपोषण कर्ते बसले आहेत. त्यामुळे सरकार, सरकारी यंत्रणा यांचे काही देणे घेणे नाही असे चित्र आहे. पोलीस काय ते एकटे खिंड लढवत आहेत, बाकी सर्व दाखवण्याचा निव्वळ फार्स.

शिक्षक नेते सोमनाथ जाधव आणि बंजारा समाजाचे विश्वनाथ राठोड म्हणाले आम्ही गेल्या ११ वर्षापासून आंदोलन करतो पण अजून न्याय नाही. जेव्हा सरकार दरबारी मुड आला तेव्हा कुणीतरी येते निवेदन घेवून जाते,सांगतो कळवतो असे उत्तर देते झाले मग, असेच वर्षानुवर्षे सुरू आहे. कोण्यातरी वर्षी न्याय मिळेल म्हणून आमची वारी सुरू आहे.

संतोष राजवाडे अंगणवाडीच्या महिलांचा मोर्चा घेवून आल्या आहेत, त्यांनी महिला बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांची भेट घेतली आणि महिलांच्या शिस्तमंडळाला भेटा त्यांचे उपोषण सुरू आहे अशी विनंती केली. त्यावर मंत्री मोहदय म्हणाल्या, नको नको त्या महिला फार ओरडून बोलतात? संतोष म्हणाले, राज्यातल्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या ह्या महिला आहेत त्यांना तरी पाच मिनिट द्यायला पाहिजे होते. कुणी उपाशी आहे कुणी आजारी आहे, कुणाला वाटते आमचे कधीतरी मायबाप सरकार ऐकेल पण छे..! मुख्य मिडिया, सरकार, प्रशासन, आणि हे आंदोलन यांचा काहीही संबंध नाही.

एकूण सर्व वातावरण पाहता, विधानभवनाच्या आतमध्ये चाललेले अधिवेशन हे उपोषण करणाऱ्या त्या ३० हजारावून अधिक उपोषणकर्त्यांसाठी आणि त्यांच्यावर अवलबून असणाऱ्या लाखो लोकांकरिता नाही असेच दिसते. या गरीब कष्टकरी उपोषण करणाऱ्या या दुखितांचे अश्रू पुसणार तरी कोण? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### पोलिसांना जेव्हा फुटतो पान्हा..!



ऐन उन्हात दुपारी २ वाजता पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंघल आणि सहपोलीस आयुक्त नवीनचंद रेड्डी यांची उपोषण सुरू असलेल्या यशवंत स्टेडियम मध्ये एंट्री होते. दोन महिला हिमंत करून त्यांना पाणी मागतात, सिंगल हातातली पाण्याची बॉटल त्या महिलेला देतात. सिंघल महिलांशी बोलतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, येथे असणाऱ्या महिलांना त्यांच्यासोबत असणाऱ्या मुलाना तीन दिवसापासून घोटभर पाणी सुद्धा पिण्यासाठी नाही. सिंघल, रेड्डी यांच्याकडे इशारा करतात रेड्डी फोन लावतात. सिंघल, रेड्डी महिलांशी अधार्तास तिथेच बोलत थाबतात. अर्धातासाने अगदी पोलीस बंदोबस्तात जिथे महिलांना बोलत सिंगल आणि रेड्डी थांबले होते तिथे थेट तंबू जवळ दोन टँकर आले. सर्व महिलांनी पाणी भरुन घेतले. पाणी टाकलेल्या त्या टँकर वाल्याला सांगितले हे दिवसभर सुरू ठेव. ते दोघेही तिथून जेव्हा बाहेर जाण्यासाठी निघाले तेव्हा सुरुवातीला आलेल्या महिला समोर येवून आभार मानत होत्या, त्यावर त्या दोघांनेही हात जोडले.

येथे पोलिसांना पान्हा फुटला. पण, प्रशासन आणि सरकार यांना मात्र जाग येत नाही. या अनुषंगाने प्रशासनाच्या संबंधित असलेल्या अनेक व्यक्तीशी आम्ही संपर्क साधायचा प्रयत्न केला पण त्यांनी मात्र समाधानकारक उत्तरे दिली नाहीत

# ट्रक दरीत कोसळून २२ मजूर ठार



■ वृत्तसंस्था
अरुणाचल प्रदेश, दि. ११ :
अरुणाचल प्रदेशातील अनजॉ जिल्ह्यातील हयुलियांग परिसरात एक ट्रक १ हजार फूट खोल दरीत कोसळला. या अपघातात चालक आणि क्लिनरसह २१ जणांचा मृत्यू झाला. बचाव पथकाला १८ मृतदेह सापडले. ही माहिती आज समोर आली.
अपघातात एक व्यक्ती जिवंत वाचला होता, जो दोन दिवस पायी चालत कसातरी आर्मी कॅम्पमध्ये पोहोचला. त्यानंतर आज सकाळी लष्कराचे बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. पथकाला घटनास्थळी पोहोचायला १० तासांपेक्षा जास्त वेळ लागला. अपघातात जखमी झालेला व्यक्ती मोठ्या प्रयत्नाने दरीतून बाहेर आला आणि हयुलियांग-चगलगाम रस्त्यावर पोहोचला. दोन दिवस पायी चालत डिसेंबरच्या रात्री चिपरा कॅम्पमध्ये पोहोचला. तिथे त्याने जवानांना अपघाताची माहिती दिली. त्यानंतर गुरुवारी सकाळी लष्कराने बचावकार्य सुरू केले.

## एफआयआरमध्ये नाव आले म्हणजे व्यक्ती दोषी आहे असे नाही

### मुख्यमंत्र्यांनी दिले सभागृहात स्पष्टीकरण



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
पुण्यातील मुंढवा भूखंड घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार अडचणीत सापडलेत. त्यांच्यावर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. पण अद्याप त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यावर आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

कोणत्याही कारवाईत एफआयआर हा पहिला टप्पा असतो. पण एफआयआरमध्ये नाव आले म्हणजे संबंधित व्यक्ती दोषी आहे असे नसते किंवा एफआयआरमध्ये नाव नाही याचा अर्थ तो दोषी नाही असे होत नाही, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री या प्रकरणी एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले, पुण्यातील जमिनीच्या व्यवहाराचे हे प्रकरण आहे. ते उजेडात आल्यानंतर सरकारने कारवाई करण्यात एक मिनिटही दवडला नाही. कायदेशीर कारवाईत एफआयआर हा पहिला टप्पा असतो. पण एफआयआरमध्ये नाव नमूद केले म्हणून एखादा व्यक्ती दोषी आहे असे होत नाही. प्रस्तुत प्रकरणात ज्या व्यक्तीने सरकारची जमीन विकली त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तसेच सिग्नेचरीवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रोखे अनुदाने रद्द सुधारणा विधेयक सभागृहात एकमताने मंजूर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आणि चंद्रपूरच्या राजुरा भागातील सुमारे ७० हजार कुटुंबांना आज मोठा दिलासा मिळाला आहे.
मराठवाड्यातील हजारो कुटुंबांच्या डोक्यावर टांगती तलवार असलेल्या 'मदत माश' इनामी जमिनींचा प्रश्न अखेर निकाली निघाला. या जमिनींवरील निवासी घरे नियमित करण्यासाठी आता कोणताही नजराणा भरावा लागणार नाही. ती घरे मोफत नियमित करून रहिवाशांना जमिनीचे 'वर्ग-१' मालकी हक्क देणारे 'हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

## लोकायुक्तासाठी अण्णा हजारे पुन्हा मैदानात

३० जानेवारीपासून करणार उपोषण



■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. ११ :
ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यानी लोकायुक्तांसाठी पुन्हा एकदा उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले असून, त्यात त्यांनी आपण लोकायुक्त विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी ३० जानेवारी २०२६ पासून राळेगण सिद्धीतील यादवबाबा मंदिरात उपोषण करणार असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, अण्णांनी तपोवनातील वृक्षतोडीलाही विरोध दर्शवला आहे. नाशिक येथील वृक्ष तोडीवर बोलताना अण्णा हजारे म्हणाले, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील तपोवन येथील वृक्षतोड केली जाणार आहे. कुंभमेळा हा जरी समाजहिताचा आणि राष्ट्र हिताचा असला तरी त्यासाठी झाड तोडू नयेत. फारच आवश्यक असेल तर छोटी झाड तोडावीत. मात्र, मोठ्या झाडांना तोडू नये, अशी माझी विनंती असल्याचे हजारे यांनी म्हटले आहे.

# ६ लाख ५६ हजार शेतकरी ६ वर्षांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत

शासकीय अनास्था सरकारची कबुली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
एकीकडे सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे दावे करत असले, तरी वस्तुस्थिती मात्र भीषण आहे.

२०१७ सालच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत पात्र ठरूनही राज्यातील तब्बल ६ लाख ५६ हजार शेतकरी गेल्या आठ वर्षांपासून कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, उच्च न्यायालयाचे आदेश असूनही या शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पैसा मिळालेला नाही. खुद्द सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत लेखी उत्तरात ही कबुली दिली.

आमदार भास्कर जाधव यांनी विधानसभेत विचारलेल्या एका तारांकित प्रश्नाला उत्तर देताना ही गंभीर बाब समोर आली. उच्च न्यायालयाने या योजनेतील पात्र शेतकऱ्यांना तातडीने लाभ देण्याचे आदेश दिले होते. या उर्वरित शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी सरकारला ५९७५.५१ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र, सरकारने पुरवणी मागण्यांमध्ये या महत्त्वपूर्ण विषयासाठी केवळ ५०० कोटी रुपयांची जुजबी तरतूद केली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाला हरताळ फासला जात असून, ८ वर्षे उलटूनही शेतकऱ्यांची थट्टा सुरूच असल्याचे चित्र आहे.

एकीकडे जुनी कर्जमाफी रखडली असताना, दुसरीकडे मुख्यमंत्री सहायता निधीचाही धक्कादायक कारभार समोर आला आहे. आरटीआय कार्यकर्ते वैभव कोकाट यांनी मिळवलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर महिन्यात मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये तब्बल १ अब्ज रुपये जमा झाले. साखर कारखान्यांना प्रति टन १० रुपये देण्याचे फर्मान काढून ही रक्कम जमा करण्यात आली होती. मात्र, इतका मोठा निधी हाती असूनही, त्यातील केवळ ७५ हजार रुपयेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहेत. मदतनिधीच्या नावाखाली जमा झालेला हा पैसा नक्की जातोय कुठे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.











# विधीमंडळ अधिवेशन

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा... पण मंत्रीच नाहीत!




■ **नागपूर :** नियम २९३ अंतर्गत सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होताना आमदार भाष्कर जाधव हे अधिवेशन नागपुरात होत आहे. पण संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी या अधिवेशनातून आपल्या पदरात काय पडते यासाठी या अधिवेशनाकडे डोळे लावून बसला आहे. पण सत्ताधारी पक्ष व सरकारची उदासिनता सांगत आहे की, शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडणार नाही. त्याचे कारण हे आहे की, हा पहिला प्रस्ताव सभागृहात चर्चेला येत असताना जर एखादा कॅबिनेट मंत्री सभागृहात हजर नसेल तर सभागृह चालवता येत नाही म्हणून इथे एक कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. मला वाटते मदत व पुनर्वसन खाते त्यांच्याकडे आहे. या २९३ च्या प्रस्तावात शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. पण कृषिमंत्री नाहीत. इथे दुग्ध, मत्स व पशुसंवर्धन कुठे आहेत. त्यांचा पत्ता नाही. इथे महसूल मंत्री कुठे आहेत. त्यांचाही पत्ता नाही. त्यामुळे सरकारला केवळ एक प्रस्ताव मांडला आणि बाहेर मीडियापुढे मोठमोठ्याने मुलाखती दिल्या, म्हणजे शेतकऱ्यांच्या पदरात काहीतरी पडेल असे सांगण्याचा आव आहे. सभागृहात फलोत्पादन मंत्रीही नाही. सत्ताधारी शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी भास्कर जाधव यांच्या मागणीला पाठिंबा दिला. आज सभागृहात एवढ्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना सरकारचा एकच कॅबिनेट मंत्री उपस्थित आहे. ही शेतकऱ्यांविषयी सरकारची अनास्था आहे. हे चित्र चांगले नाही. त्यामुळे अध्यक्षांनी मंत्र्यांना समज दिली पाहिजे, असे ते म्हणाले.

## अवैध वाळू वाहतुकीचा मुद्दा सभागृहात

■ **नागपूर :** राज्यात अवैधरित्या वाळूची वाहतूक व विक्रीमुळे शासनाचा महसुलाचे नुकसान होत असल्याचा प्रश्न सदस्य कृपाल तुमाने, हेमंत पाटील, मनिषा कायंदे यांनी सभागृहात मांडला. त्यावर महसूल मंत्री बावनकुळे यांच्या वतीने राज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिले.

योगेश कदम म्हणाले, दिनांक १९/०४/२०२३ च्या वाळू धोरणानुसार वाळू डेपोमधून रुपये ६००/- प्रती ब्रास दराने वाळूची विक्री करण्यात येत होती. सदर धोरण आता अस्तित्वात नसून दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून त्यामध्ये लिलावाद्वारे वाळू निर्गती करण्याच्या तसेच, परराज्यामधील वाळूच्या सनियंत्रण करण्याबाबतच्या तरतूदी विहित करण्यात आले आहेत.

याशिवाय वाळू रेती निर्गती धोरण-२०२५ अन्वये नदी/खाडी पात्रातील पर्यावरण अनुमती प्राप्त वाळू गटांचे लिलाव करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार सद्यःस्थितीत राज्यात २२३ वाळू गटांचे लिलाव झाले असून त्यामधून रुपये २०३ कोटी इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. वाहतूक प्रकरणी ९९४ गुन्हे दाखल करुन १५३ आरोपींना अटक केली आहे व एम.पी.डी.ए कायद्यानुसार ९ कारवाया केल्या आहेत. तसेच रुपये ५०.८७/- कोटी इतक्या दंडाची वसूली केली असल्याचेही मंत्री योगेश कदम यांनी सभागृहात सांगितले.

## विद्यार्थिनीच्या आत्महत्येचे पडसाद



■ **नागपूर :** भिन्नधर्मीय १५ वर्षीय मुलाच्या छेडछाडीला कंटाळून एका १३ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना अकोल्यात घडली होती. या घटनेचे पडसाद अधिवेशनात आज उमटले. आमदार रणधीर सावरकरांनी हा मुद्दा उपस्थित केला.

अल्पवयीन विद्यार्थिनीला विशिष्ट धर्माच्या मुलाकडून गत सहा महिन्यापासून त्रास देण्यात येत होता. तिच्या वडिलांनी संबंधित शाळेला सूचना सुद्धा केली. पोलीस तक्रार केली. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याने पीडित मुलीने आपले जीवन संपवले. ही बाब अतिशय गंभीर असल्याने अकोल्यातील गीता नगर मधील सेंट जॉन्स नावाच्या शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी. ज्यांनी याकडे दुर्लक्ष केले असेल त्यांच्यावर कारवाई करावी, असे ते म्हणालेत.



### दररोज ८ आत्महत्या राज्यासाठी लज्जास्पद...

# विधानसभेत नाना पटोले कडाडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय्य भाव देणारी हमीभाव खरेदी प्रक्रिया अजूनही सुरू न झाल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. विशेषतः जालना, कोल्हापूर, अमरावती, लातूर, अकोला, नागपूर, नांदेड आणि चंद्रपूर या प्रमुख कृषी जिल्ह्यात शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रे अद्याप कार्यान्वित न झाल्याचे समोर आल्याने शेतकरी बाजारात हमीभावापेक्षा खूपच कमी दरात माल विकण्यास मजबूर झाले आहेत.

या गंभीर परिस्थितीवर काँग्रेसचे नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनातील विधानसभा सभागृहात जोरदार आवाज उठवला. पटोले यांनी सरकारवर ताशेरे ओढत सांगितले की, शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचे सरकारकडून पालन न होताच, उत्पादकांना त्यांच्या मेहनतीच्या पिकाचा योग्य मोबदला मिळत नसून शेतकरी पुन्हा संकटात ढकलले जात आहेत.

या चर्चेदरम्यान पटोले यांनी चंद्रपूर जिल्ह्याबाबतही गंभीर मुद्दा उपस्थित केला. अलीकडील अतिवृष्टीमुळे चंद्रपूरमधील मोठ्या प्रमाणातील कपाशीचे नुकसान झाले असून, या जिल्ह्यातील शासकीय कापूस खरेदी केंद्रे देखील सुरू न झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रश्नावर सरकारकडून माहिती चुकीची आहे, असे उत्तर मिळाले, मात्र त्याच सत्तापक्षातील एका आमदारानेही या समस्येची पुष्टी करत या परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित केले. त्यामुळे सरकारने नाकारणे आणि मैदानावर प्रत्यक्ष वास्तव वेगळे असल्याचा विरोधाभास अधिवेशनात उघड झाला. या पार्श्वभूमीवर पटोले यांनी सातत्यपूर्ण हस्तक्षेपाची मागणी करत सरकारवर वास्तवापासून दूर राहण्याचा, आरोप केला.

शेतकऱ्यांच्या दैनंदिन आयुष्यात वाढत्या आर्थिक ताणामुळे चिंतेची परिस्थिती निर्माण झाली असून, पटोले यांनी आत्महत्येच्या प्रश्नालाही अधिवेशनात अधोरेखित केले.

दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत, ही बाब केवळ लाजीरवाणी नव्हे, तर राज्याच्या कृषी धोरणातील गंभीर अपयशाचे द्योतक आहे, असे ते म्हणाले.

त्यांनी सरकारवर संवेदनाशून्य आणि बोथट, असल्याचा आरोप करत सांगितले की, शेतकऱ्यांच्या समस्या ऐकण्यासाठी सरकारकडून तत्परता नसल्याने त्यांच्या वेदना अधिकच वाढत आहेत. त्यांना हमीभाव, विमा, नुकसान भरपाई, तांत्रिक मदत-कसलीही मदत वेळेवर मिळत नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे, असे पटोले यांनी सांगितले.

### नार्वेकर यांच्या दालनात बैठकीचे आयोजन

या सा?्या प्रकरणात पटोले यांनी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्याकडे विशेष हस्तक्षेपाची विनंती केली. सरकारने दिलेल्या उत्तरात आणि प्रत्यक्ष पातळीवरील तुटवड्यात मोठे अंतर असल्याने, विषय अत्यंत संवेदनशील आणि तातडीचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आपण या असंवेदनहीन सरकारला कडक सूचना देणे आवश्यक आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या समस्या न सुटता वाढतच जातील. त्यांच्या उत्पादनाची खरेदीच सुरु नसल्याने आणि बाजारात भाव घसरल्याने शेतकरी पुन्हा आर्थिक गर्तेत अडकतील, असे पटोले म्हणाले. त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत अध्यक्ष नार्वेकर यांनी या प्रकरणावर आपल्या दालनात बैठक घेण्याचे जाहीर करत पुढील कार्यवाहीचे संकेत दिले.

## कुत्रे पकडू शकत नाही... बिबट काय पकडणार?



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**

सरकार सर्वसामान्यांना चावे घेऊन त्रास देणाऱ्या श्वानांना पकडू शकत नाही ते बिबट्या काय पकडणार? असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते व आमदार जयंत पाटील यांनी केला. विधान भवन परिसरात जयंत पाटील बोलत होते.

राज्यात बिबट्यांचे हल्ले तसेच मोकाट श्वानांचे चावे, असे दोन्ही मुद्दे गाजताहेत. अशात गुरुवारी सकाळी विधानभवन परिसरातील श्वानांना पकडण्यासाठी नागपूर महापालिकेची गाडी आली होती. परंतु, महापालिकेचे कर्मचारी श्वानांना पकडू शकले नाही.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शपचे ज्येष्ठ आमदार जयंत पाटील यांनी गुरुवारी सरकारवर खोचक टीका केली. हे सरकार कुत्रे पकडू शकत नाही, ते बिबट्या काय पकडणार? असे विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले.

विधानभवन परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट श्वानांचा वावर आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दोन-तीन श्वान आमदारांच्या स्वागतसाठी टाकण्यात आलेल्या रेड कार्पेटवर उन खात बिनधास्त पहुडले होते. याशिवाय परिसरातील इतर भागातही मोकाट श्वान आढळले आहेत. श्वानांचा चावा आणि बिबट्याचे हल्ले असे, दोन्ही मुद्दे सध्या चर्चेत आहेत. या पार्श्वभूमीवर जयंत पाटलांनी सरकारला टोला लगावला आहे.

गुरुवारी सकाळी विधानभवन परिसरातील श्वानांना पकडण्यासाठी नागपूर महापालिकेची गाडी आली होती. परंतु, महापालिकेचे कर्मचारी श्वानांना पकडू शकले नाही. रिकाम्या हाताने त्यांना माघारी परतावे लागले. हा धागा पकडत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी जयंत पाटील यांना प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी हे सरकार कुत्रे पकडू शकत नाही, ते बिबट्या काय पकडणार? अशी मिश्कील टिप्पणी केली.

**चार दिवसांच्या अधिवेशनात न्याय कसा मिळणार?**

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३२ जीआर काढलेत. आतापर्यंत २१ हजार कोटींची आर्थिक मदत केल्याचे सांगण्यात येत आहे. यावर बोलताना जयंत पाटील म्हणाले,सरकार कितीही म्हणत असल तर लोकांचे समाधान झालेले नाही. अनेकांना अद्याप मदत मिळालेली नाही. शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत मदत मिळत नाही. चार दिवसांच्या अधिवेशनातून शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. येत्या निवडणुकांमध्ये आम्ही महाविकास आघाडी म्हणून जिकडे शक्य आहे तिकडे एकत्र लढू, असे देखील ते म्हणाले.

## इतक्या शेळ्या आणणार कुठून?

### आमदार मंदा म्हात्रेंचा नाईकांना प्रश्न





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
नागपूरसह राज्यातील विविध भागात बिबट्या धुमाकूळ घालत आहे. त्यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी एक कोटी शेळ्या जंगलात सोडणार असल्याचे सांगितले होते. त्यावर भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनी भाष्य केले आहे. नागपुरातील विधान भवन परिसरात त्या बोलत होत्या.

बिबटवर उपाय करण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी एक कोटी शेळ्या जंगलात सोडण्याची घोषणा केली आहे. हा उपाय तात्पुरता आहे. कोल्हे, हरीण यांची जैवविविधता साखळी वाढविण्याची गरज आहे. हे सर्व प्राणी बिबट्याचे खाद्य आहे. त्यांची संख्या वाढवायला हवी. बिबट्यांसाठी एक कोटी शेळ्या आणणार कुठून असा सवाल भाजपच्या ज्येष्ठ आमदार मंदा म्हात्रे यांनी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना उपस्थित केला.

यासंदर्भात बोलताना आमदार डॉ. आशिष देशमुख म्हणाले, वनमंत्री गणेश नाईक यांनी बिबट्याला शेड्युल एकमधून दोनमध्ये आणण्याबाबत प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला आहे. खरे तर बिबट्या वर्षातून तीन ते चार बछडे देतात. त्यामुळे ही संख्या वाढली आहे. संख्या कमी करण्यासाठी कलिंग पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

विधानभवन परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट श्वानांचा वावर आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दोन-तीन श्वान आमदारांच्या स्वागतसाठी टाकण्यात आलेल्या रेड कार्पेटवर उन खात बिनधास्त पहुडले होते. श्वानांचा चावा आणि बिबट्याचे हल्ले असे, दोन्ही मुद्दे सध्या चर्चेत आहेत. या पार्श्वभूमीवर जयंत पाटलांनी सरकारला टोला लगावला आहे.

गुरुवारी सकाळी विधानभवन परिसरातील श्वानांना पकडण्यासाठी नागपूर महापालिकेची गाडी आली होती. परंतु, महापालिकेचे कर्मचारी श्वानांना पकडू शकले नाही. रिकाम्या हाताने त्यांना माघारी परतावे लागले. हा धागा पकडत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी जयंत पाटील यांना प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी हे सरकार कुत्रे पकडू शकत नाही, ते बिबट्या काय पकडणार, अशी मिश्कील टिप्पणी केली.

## देवस्थानच्या जमिनीबाबत श्वेतपत्रिका काढा : विजय वडेट्टीवार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
राज्यात देवस्थानच्या जमिनीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाला असून त्याची श्वेतपत्रिका काढा, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. ते हैदराबाद इनामी व रोख अनुदाने रद्द सुधारणा विधेयकावर बोलत होते.

राज्यात नुकताच मुंढवा जमीन प्रकरण झाले. यात सरकारची महार वतनाची जमीन देण्यात आली. त्यात कुणावर कारवाई झाली, कुणावर झाली नाही. त्यावर नंतर चर्चा होईल. पण अशाच पद्धतीने देवस्थानच्या ५० टक्के जागा या हेराफेरी करून देण्यात आल्या आहेत. प्रशासन आणि राजकीय नेत्याच्या संगनमताने कागदात फेरफार करून जमिनीची विल्हेवाट लावली जाते. हे गंभीर आहे. त्यामुळे देवस्थानच्या जमिनीबाबत श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. निजाम कालीन इनाम जमीन ही एका खासदाराने आपल्या ड्रायव्हरच्या नावाने घेतल्याचे वृत्त होते. १५९ कोटींची जमीन लाटली की घेतली? असे भ्रष्टाचार होत असल्याने जमिनीबाबत सरकारने श्वेतपत्रिका काढावी, असे वडेट्टीवार म्हणाले.

## विदर्भ वैधानिक विकास मंडळावरून मुनगंटीवारांनी सुनावले खडेबोल



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विदर्भ व मराठवाडा वैधानिक विकास मंडळांवरून आपल्याच महायुती सरकारला घरचा आहेर दिला. सरकारने विदर्भावर अन्याय करू नये. उद्योग असतील, रस्ते असतील, सर्वकाही पुणे व मुंबई विभागातच जात असेल तर आम्ही काय करायचे? विदर्भ वैधानिक मंडळ आमचे सुरक्षा कवच असून, सरकारने त्यावर अन्याय करू नये, असे ते म्हणालेत.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विदर्भ वैधानिक विकास मंडळ हा आमचा हक्क व सुरक्षा कवच आहे. सरकारने हे सुरक्षा कवच काढले तर विदर्भासाठी निधीचा उपयोग म्हणावा तसा होणार नाही. आम्ही नोकरीवर बोललो तर वैधानिक विकास मंडळ अस्तित्वात नसल्याने आम्ही त्यावर भाष्य करू शकत नाही असे उत्तर मिळते. अर्थसंकल्पात निधीचे समनिहाय वाटप दाखवले जाते. पण तसा खर्च झाला का? याची यादी मी मागितली. पण त्याला अद्याप उत्तर मिळाले नाही. त्यामुळे मी भूमिका मांडली.

विदर्भात येऊन हुरडा खा, अतिथी देवो भव. तुम्ही आमच्यासाठी देवसारखेच आहात. पण तुमची वर्तवणूक देवासारखी ठेवा. देणाऱ्याची ठेवा. तुम्ही इथे येऊन हुरडा खाऊन परत जाल, तर हे विदर्भातील जनतेवर अन्याय करणारे ठरेल.

मुनगंटीवार पुढे म्हणाले, आपण नागपूरला देशाचे हृदय मानतो. तिथे बसून आपण सर्वंकष विचार केला नाही तर या विभागातील आमचे आदिवासी बांधव, अनुसूचित जाती- जमातीचे लोक व गरीबांवर अन्याय होईल. आजही ह्यूमन इंडेक्समध्ये १२५ तालुक्यांपैकी ६० विदर्भातील आहेत. त्यामुळे आमच्यावर अन्याय करू नका. ११ लाख कोटींचे काम मुंबई, पुण्याकडे दिले जाते. मग आम्ही काय करायचे? त्यामुळे आम्हाला आमचे सुरक्षा कवच असणारे वैधानिक विकास मंडळ हवे आहे. मी आमदारांचे स्वाक्षऱ्यांचे एक पत्र सरकारला देणार आहे.

**जयंत पाटलांनीही साधला निशाणा**

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी सरकारवर विरोधी पक्षांच्या आमदारांना निधी देण्याएवढे सरकारचे मोठे मन नसल्याचा आरोप केला. ते म्हणाले, विरोधी पक्षांच्या आमदारांना निधी देण्याएवढे मोठे मन या सरकारचे नाही. मात्र जे सत्तेत आहेत ते देखील खुश नसल्याचे दिसत आहे. २

## अधिवेशनात पोहोचण्यासाठी दादांसोबत प्रवास



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**

शरद पवारांच्या वाढदिवसानिमित्त दिल्लीमध्ये स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित होता. याला अजित पवारांनी हजेरी लावली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि रोहित पवार यांनी एकाच गाडीतून प्रवास केला. एका विमानामधूनही ते दोघे नागपूरला आले. यावर रोहित पवार यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे.

अजित दादांसोबत एकत्र येण्याचा मुद्दा केवळ नागपुरात पोहोचणे हा होता. नागपूरमध्ये अधिवेशन सुरू असून जनतेचे अनेक प्रश्न आम्हाला मांडायचे आहेत. त्यातच विमानांचा सध्या गोंधळ सुरू आहे. म्हणून वेळेत नागपूरला पोहोचणे आवश्यक होते. यानिमित्त मी अजित पवारांसोबत काल प्रवास केला.

त्यांच्यासोबत प्रवास करताना कुठल्याही राजकीय चर्चा न होता आमच्या परिवारात झालेला लग्न सोहळा आणि इतर सामाजिक विषयांवर चर्चा झाली. मागील अडीच वर्षांपूर्वी आमचा पक्ष फुटला. तेव्हापासूनच दोन्ही पवार गट एकत्र येणार का अशी चर्चा रंगत असते. मात्र आजपर्यंत तसे काहीही घडलेले नाही, एकत्रीकरणावर चर्चा झाली नसल्याचे ते म्हणाले.

## पुरवणी मागण्या बजेटवर सतेज पाटलांचा सर्जिकल स्ट्राइक



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सरकारने राज्याच्या अर्थिक बजेटमध्ये मंजूर झालेल्या पुरवणी मागण्यावर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी सरकारला धारेवर धरले.

राज्याचे एकूण कर्ज 9,32,000 कोटी वाढून प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर 82 हजारांचे कर्ज वाढले आहे. ही वाढ म्हणजे आर्थिक शिस्तीचा भंग आणि सरकारकडे कोणतीही दूरदृष्टी नसल्याचं द्योतक असल्याचे सतेज पाटील यांनी म्हटले आहे.

या संदर्भात विधान परिषदेमध्ये चर्चा सुरु असताना आमदार सतेज पाटील यांनी पुरवणी मागणी ही आकस्मिक निधीसाठी असताना निवडणुका डोळ्यांसमोर ठेऊन केलेली पुर्वनियोजित उधळपट्टी असल्याचा आरोप केला आहे. ती राज्याच्या आर्थिक स्थैर्यावर घाला घालणारी, आणि काही मोजक्यात लोकांचे हित जपणारी आहे. सरकारने आर्थिक शिस्त कुठे? प्राधान्यक्रम कुठे? आणि जनतेचे हित कुठे? याचे उत्तर दिले पाहीजे, अशी मागणी देखील त्यांनी केली.

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये आज सरकारने राज्याच्या अर्थिक बजेटमध्ये मंजूर झालेल्या पुरवणी मागण्यावर विस्तृत मत मांडले. राज्य सरकारने आणलेल्या पुरवणी मागण्या या आर्थिक गरजेपेक्षा निवडणूकपूर्व राजकीय स्वार्थाने प्रेरित असल्याचे सरकारला जाणवून दिले. 7.5 लाख कोटींचे बजेट आता 8 लाख 90 हजार कोटींवर पोहोचले आहे. त्यामूळे मुळ अर्थसंकल्प तब्बल 17. 53 % ने फुगवला आहे.

राज्याचे एकूण कर्ज 9,32,000 कोटी वाढून प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर 82 हजारांचे कर्ज वाढले आहे. ही वाढ म्हणजे आर्थिक शिस्तीचा भंग आणि सरकारकडे कोणतीही दूरदृष्टी नसल्याचं द्योतक आहे.

पुरवणी मागण्या या आकस्मिक खर्चासाठी असतात; पण लाडकी बहीण, नगरविकास प्रकल्प, कर्जफेड यांसारख्या पूर्वनियोजित बाबींवर पुरवणी मागण्या आणणे म्हणजे निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी आहे! 87 % निधी फक्त 11 विभागांना देण्यात आला असून कृषी, पशुसंवर्धन, ग्रामीण विकास यांसारख्या मूलभूत क्षेत्रांसाठी तुटपुंज्या तरतुदी केल्या आहेत.

2025 च्या पहिल्या 3 महिन्यातच राज्यात 767 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातील 269 फक्त मराठवाड्यातील आहेत.राज्यातील पीक विमा योजना बंद केल्या आणि कृषी समृद्धी चालू केली गेली मात्र वित्त खातं त्याला न्याय देत नाही. कृषी खात्याला फक्त 616 कोटी निधी दिला असून त्यातील तब्बल 222 कोटी गोशाळांना वितरित केला आहे. शेतकऱ्यांची 12,500 कोटींचे प्रलंबित देयके असताना केवळ 616 कोटी रुपयांची तरतूद ही शेतकऱ्यांचा अपमान आहे.

आज महाराष्ट्रात दररोज 6 खून आणि 23 बलात्कार होत असताना गृहविभाग काय करत आहे? पुण्यात कोयता गँग सक्रिय आहेत. राज्यातील महिला आणि मुली अत्याचाराला बळी पडत आहेत. संतोष देशमुख प्रकरण असेल, डॉ. संपदा मुंडे प्रकरण असेल अशा घटनांमुळे महाराष्ट्राच्या कायदा सुवव्यवस्थेवर डाग पडला आहे.

पुरवणी मागणी ही आकस्मिक निधीसाठी असताना निवडणुका डोळ्यांसमोर ठेऊन केलेली पुर्वनियोजित उधळपट्टी आहे. ती राज्याच्या आर्थिक स्थैर्यावर घाला घालणारी, आणि काही मोजक्यात लोकांचे हित जपणारी आहे. सरकारने आर्थिक शिस्त कुठे? प्राधान्यक्रम कुठे? आणि जनतेचे हित कुठे? याचे उत्तर दिले पाहीजे, अशा शब्दात आमदार सतेज पाटील यांनी सभागृहात सरकारचे वाभाडे काढले.

# नाग नदीच्या दूषित पाण्याचा फटका : आ. फुकेंचा संताप





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
नाग नदीतील प्रदूषित पाण्याने वैनगंगा नदी प्रदूषित झाली आहे. या वैनगंगेचे पाणी भंडारा, गोंदिया जिल्ह्यात पिण्यासाठी दिले जाते. या जिल्ह्यातील गावांतील पाण्याची कधीही प्रशासनाने तपासणी केली नाही.

याच धरणाचे पाणी चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील शेतीला दिले जाते. एवढेच नव्हे भविष्यात राज्य सरकारकडून प्रस्तावित वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून नरखेड, काटोलसारख्या गावांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नाग नदीच्या प्रदूषित पाण्यावर लक्ष वेधत आहे. परंतु आजपर्यंत तोडगा निघाला नाही. त्यातच आज पर्यावरण विभागाने चुकीची माहिती दिल्यावर संताप व्यक्त करीत आमदार डॉ. परिणय फुके यांनी प्रशासनावर जोरदार प्रहार केला.

नाग नदीतील प्रदूषित पाणी व त्यामुळे फटका बसलेल्या जिल्ह्यांबाबत परिषदेत लक्षवेधीद्वारे डॉ. परिणय फुके यांनी मुद्दा लावून धरला. पर्यावरण विभागाने दिलेल्या उत्तरावर तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांनी स्पष्ट केले की, शासनाचे स्पष्टीकरण वास्तविक परिस्थितीपासून दूर असून नाग नदीच्या प्रदूषणाच्या भीषणतेचे गांभीर्य लक्षात न घेणारे आहे.

डॉ. फुके म्हणाले, नदीतील चांगल्या पाण्याची बीओडी ३ एमजी प्रती लिटर असते तर नाग नदीतील पाण्याची बीओडी तब्बल २८.८ एमजी प्रति लिटर आहे. या पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन जवळपास शून्य असतो. त्यामुळे ही नदी गटार बनली आहे, हे शासनानेच मान्य केले आहे. तरीदेखील मच्छीमारांच्या व्यवसायावर परिणाम नाही आणि जनावरांवर विपरीत परिणाम नाही असा दावा करणे म्हणजे वास्तवाला नाकारण्यासारखे आहे, असा प्रहार डॉ. फुके यांनी केला.

शासनाने नाग नदीतील पाण्याबाबत तक्रार नाही असे सांगून समस्येचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. लोकांनी तक्रार केली तरच समस्या नाही, हा युक्तिवाद चुकीचा आहे. शासनाने स्वतःहून वैज्ञानिक सर्व्हे करणे अपेक्षित होते, असे ते म्हणाले. विभाग म्हणतो की १३ एसटीपी सुरू केली. प्रत्यक्षात दोनच एसटीपी सुरू आहेत. याशिवाय जवळपास ८०० ते ८५० एमएलडी सांडपाणी नाग नदीत जाते. मात्र ही आकडेवारीही कमी दाखवण्यात आली आहे, यावर डॉ. फुके यांनी संताप व्यक्त केला.

नाग नदी प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन प्रकल्पाला मार्च २०२३ मध्ये १९२६ कोटींची मान्यता मिळाली असली, तरी २०२५ पर्यंतही प्रत्यक्ष काम किती झाले याबाबत शासनाने स्पष्ट उत्तर दिलेले नाही, अशी टीकाही परिणय फुके यांनी यावेळी केली.

# चिखलदऱ्यात स्कायवॉक निर्मितीला वेग

## देशातील सर्वात लांब काचेचा स्कायवॉक लवकरच पर्यटकांच्या सेवेत

**महासागर | प्रतिनिधी**

**चिखलदरा, ( दि.11 )–** विदर्भाचे काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यात उभारला जाणारा काचेचा स्कायवॉक आता अंतिम टप्प्यात पोहोचत असून ट्रॅकचे काम अर्ध्याहून अधिक पूर्ण झाले आहे. अवघ्या काही महिन्यांतच हा अद्वितीय स्कायवॉक पर्यटकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे. येत्या काळात संपूर्ण काचेचे पॅनेल बसवण्याचे काम वेगाने सुरू होत आहे.

भारताचा पहिला आणि जगातील सर्वात लांब काचेचा स्कायवॉक चिखलदऱ्यात उभा राहत आहे. तब्बल 1,500 फूट उंचीवर आणि 500 मीटर लांबीच्या



या स्कायवॉकला जगात विशेष स्थान मिळणार आहे. स्वित्झर्लंडचा 397 मीटर आणि चीनचा 360 मीटर स्कायवॉक मागे टाकत चिखलदऱ्याचा हा स्कायवॉक जगातील तिसरा आणि लांबीच्या दृष्टीने सर्वात मोठा ठरणार आहे.

34 कोटी रुपयांच्या या प्रकल्पास दोन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता, मात्र कोरोनामुळे काम काही काळ मंदावले होते. गाविलगड किल्ला, भीमकुंड, कीचकदरी, पंचबोल, सनसेट पॉइंट आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारख्या पर्यटन स्थळांच्या सोबत स्कायवॉकची भर चिखलदऱ्याचे आकर्षण आणखी वाढवणारी ठरणार आहे. चिखलदऱ्याच्या पर्यटन विकासातील हा स्कायवॉक गेमचेंजर ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### चिखलदऱ्यातील पर्यटनाला नवी झळाळी

गोराघाट पॉइंट ते हरिकेन पॉइंटदरम्यान उभारल्या जाणाऱ्या या गगनचुंबी पुलामुळे चिखलदऱ्यातील पर्यटनाला नवी झळाळी मिळणार आहे. दोन मोठ्या टेकड्यांना जोडणाऱ्या या काचेच्या मार्गावरून चालणे हे अनेकांसाठी अद्वितीय आणि रोमांचकारी अनुभव ठरणार आहे. खाली पसरलेल्या मेळघाटाच्या निसर्गरम्य दरीचे सौंदर्य 1,500 फुटांवरून अनुभवण्याची ही दुर्मीळ संधी पर्यटकांना आकर्षित करणार हे निश्चित.



# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीचा उत्साह ओसरला?

## कट्ट्यांवरील चर्चा थंडावल्या

**महासागर | प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.11 )–** नगरपरिषद निवडणुकीचा उत्साह जिथे महिनाभर गावोगावी, कट्ट्यांवर, कँटीनमध्ये आणि शेकोटीजवळ तापला होता, तो आता पूर्णपणे ओसरल्याचे चित्र दिसत आहे. 2 डिसेंबरला होणारी सार्वत्रिक निवडणूक आयोगाने अखेरच्या क्षणी स्थगित केली. त्यानंतर नव्या कार्यक्रमानुसार 20 डिसेंबर रोजी मतदान होणार असले, तरी वारंवार बदललेल्या तारखांमुळे मतदारच काय तर उमेदवारही संभ्रमात आहेत.

सुरुवातीला 4 डिसेंबरपासून नव्या कार्यक्रमासह परत प्रक्रिया सुरू झाली. 10 ते 17 नोव्हेंबरदरम्यान अर्ज दाखल, त्यानंतर छाननी, माघारीची मुदत—सर्व पार पडले. उमेदवारांनी प्रचारालाही सुरुवात केली होती. मात्र 30 नोव्हेंबरला आयोगाने निवडणूक पुन्हा स्थगित करून नव्या तारखा जाहीर केल्या. कारण म्हणून न्यायालयात गेलेल्या एका उमेदवाराला माघारीची संधी न मिळाल्याचा मुद्दा देण्यात आला.




### खर्च कुणावर, कसा करायचा?

पहिल्यांदा केलेला खर्च आणि आता नव्या प्रचारासाठी करावयाचा खर्च, करायचा कोणावर आणि कसा? वारंवार कार्यक्रम बदलल्याने रणनीती, मनुष्यबळ आणि आर्थिक आखणी सगळे विस्कळीत झाले आहे. एक महिनाभर जोमात झालेल्या चर्चा थांबल्याने प्रचाराचा सपाट टप्पा उमेदवारांना अधिकच चिंताग्रस्त करीत आहे. कट्ट्यांवरील उत्साह आणि गावाच्या ओट्यांवरील राजकीय तापमान आता निवडणुकीसोबतच गोठल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

या सगळ्या घडामोडींमुळे 10 ते 30 नोव्हेंबरदरम्यान गावाच्या प्रत्येक कोपऱ्यात पेटलेली 'कोण जिंकणार?', 'कोण पडणार?' यावरील चर्चा आता क्षणात शांत पडली. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात जोशात बोलणारा मतदार आज 'कुणाला मत द्यायचे?' असा साधा प्रश्न विचारला तरी 'थंडीने गारठल्यासारखा'शांत होत असल्याचे दृश्य सर्वत्र दिसत आहे.

# दर्यापूर-अकोट रस्त्यावर भीषण अपघात

## आयशर ट्रकची दुचाकीला जोरदार धडक   दोन तरुण गंभीर जखमी

**दर्यापूर, ( दि.11 ) –** दर्यापूर-अकोट मार्गावरील सांगलुद क्रॉसिंगवर बुधवारी रात्री आयशर ट्रकने बेपर्वाईने दिलेल्या धडकेत दोन तरुण गंभीर जखमी झाले. रात्री नऊच्या सुमारास झालेल्या या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. दर्यापूरहून दुचाकीवरून अकोटच्या दिशेने जात असलेले रोशन जवरकर (32, रा. अकोट) आणि त्यांच्यासोबत असलेला आणखी एक तरुण



सांगलुद क्रॉसिंगजवळ पोहोचताच अमरावतीकडून येणाऱ्या आयशर ट्रकने वेगाने व बेपर्वाईने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीररित्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच शिवसेना मदत कक्षाचे राहुल भुंबर तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात हलवून प्राथमिक उपचाराची व्यवस्था केली. स्थिती गंभीर असल्याने दोघांनाही अमरावती जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले असून तिथे त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.

# टोम्पेनगरात घरफोडी

**अमरावती –** चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव बंडस्थित टोम्बेनगर येथील योगेश किटुकले यांचे घर फोडून अज्ञात चोराने रोख आणि सोन्याचे दागिने असा एकूण तब्बल तीन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला. मंगळवारी सकाळी नऊ ते सायंकाळी सहाच्या सुमारास ती घटना घडली. योगेश किटुकले हे कुटुंबीयांसमवेत चुलत भावाच्या लग्नाकरिता अमरावती येथे गेले होते. परत आले असता त्यांना घराचा दरवाजे, कुलुप तुटलेले आढळले. आत जाून पाहणी केली असता, बेडरूममधील कपाट उघडे दिसले, तर लॉकरमधील सो्याचे मंगळसूत्र, सोन्याचे कानातले, चांदीच्या तोरड्या, करंडे, छोट्या वाट्या व रोख रक्कम लांबविल्याचे लक्षात आहे.

# विद्यार्थ्यांचे मोबाईल, टॅब लंपास

**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 )** शहरातील राजापेठ परिसरात पुन्हा एकदा चोरट्यांनी विद्यार्थ्यांना लक्ष्य करत धाडसी चोरी केली आहे. केएल कॉलेजजवळील एका अपार्टमेंटमध्ये घुसून अज्ञात चोरट्याने तब्बल 47 हजार रुपये किमतीचा मोबाईल व इलेक्ट्रॉनिक मुद्देमाल चोरून नेल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. सौरभ मनोहर बोळे (वय 21, रा. पारद, ता. मुर्तीजापूर) यांनी याप्रकरणी राजापेठ पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

सौरभ आणि त्याचे मित्र शिक्षणासाठी अमरावतीत राहत असून, रात्री 8 ते पहाटेपर्यंत सर्व विद्यार्थी फ्लॅटमध्ये गाढ झोपेत होते. दरम्यान, फ्लॅटचा दरवाजा अर्धवट उघडा असल्याची संधी साधत अज्ञात चोरटा आत शिरला. चोरट्याने खोलीत झोपलेल्या विद्यार्थ्यांच्या जवळूनच मोबाईल, टॅब व आयफोन–11 असा महागडा मुद्देमाल हातोहात लंपास केला. पहाटे सौरभचा मित्र रितेश उंबरकर उठल्यावर त्याचा मोबाईल गायब असल्याचे लक्षात आले. त्याने इतरांशी चर्चा केली असता सौरभचा टॅबही गायब असल्याचे स्पष्ट झाले. विद्यार्थ्यांनी तात्काळ शोधाशोध केली, परंतु चोरी झाल्याचे निश्चित होताच पोलिसांत धाव घेतली. तक्रार नोंदविल्यानंतर राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, सीसीटीव्ही फुटेज तपास, संशयित व्यक्तींच्या हालचाली आणि अपार्टमेंट परिसरातील माहिती गोळा करण्याचे काम सुरू केले आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.



# मेथाडोन रॅकेटवर पोलीसांची धडक कारवाई

## तिघे अटक, मुख्य पुरवठादार फरार

**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 )** शहरात मेथाडोन (एमडी) सारख्या घातक ड्रग्जच्या वाढत्या विक्रीवर आळा घालण्यासाठी गुन्हे शाखेने कडक पावले उचलली आहेत. ड्रग्जविरोधी मोहिमेत मिळत असलेल्या यशानंतर एमडी तस्करांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

गुरूवार, दि. 11 डिसेंबर रोजी गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की सय्यद सोहेल उर्फ फज्जू आणि त्याचे दोन साथीदार एमडीची डिलिव्हरी घेऊन कॅम्प येथील एका हॉटेलहून कांता नगर रोडकडे जात आहेत. पथकाने तत्काळ सापळा लावून सय्यद सोहेल उर्फ फज्जू सय्यद गफार (वय 25, गवळीपुरा), शेख अयान शेख रमजान (वय 20, हबीब नगर क्र. 2) आणि सय्यद सैफ अफसर अली (वय 27, नंदनवन कॉलनी) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून 26.830 ग्रॅम एमडी, त्रैमासिक तीन मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, तसेच एक वाहन असा एकूण 3,90,300 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपींनी सांगितले की ही खेप त्यांना सय्यद अल्तमश, शेख नईम उर्फ राजा उर्फ होंगा आणि शेख सोनू (होंगा) यांनी पुरवली होती. हे तिन्ही मुख्य पुरवठादार अद्याप फरार असून पोलिसांचा त्यांच्यावर शोधमोहीम सुरू आहे. या प्रकरणी गाडगे नगर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पीआय संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निरीक्षक महेश इंगोले, गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सुधीर गुढे, संदीप खंदारे, संग्राम भोजने, नईम बेग, विकास गुड्डे, सागर ठाकरे व योगेश पवार यांच्या टीमने केली.

# महिलेच्या गळ्यातील 5 लाखांचे मंगळसूत्र हिसकले!

**अमरावती, ( दि. 11 )** शहरात महिलांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे करणारी धक्कादायक घटना राजापेठ पोलिस स्टेशन हद्दीत घडली. घराबाहेर साधा कचरा टाकण्यासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील तब्बल 5 लाख 3 हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात दोघा लुटारूंनी क्षणात हिसकावून नेले. एका मिनिटात घडलेली ही लूट परिसरातील नागरिकांना हादरवून जाणारी ठरली आहे. फिर्यादी 36 वर्षीय महिला ही प्रमोद कॉलनीतील रहिवासी आहे. 9 डिसेंबरच्या सायंकाळी ती शंकरनगर – केडिया नगर दरम्यानच्या मेन रोडकाठच्या नाल्यात कचरा टाकण्यासाठी गेली होती. कचरा टाकून ती परत निघत असतानाच, पूर्ण तयारीत उभे असलेल्या दोन लुटारूंनी मोटारसायकलवरून तिच्याकडे झेप घेतली. वय अंदाजे 25 ते 30. चेहऱ्यावर रुमाल बांधलेला. कोणत्याही क्षणी हल्ला करण्यास सज्ज अशी हालचाल. महिला काही समजून घेण्याआधीच त्या दोघांनी तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जोरात हिसकावले. क्षणात दागिना हातात पडताच आरोपी मोटारसायकलचा वेग वाढवत घटनास्थळावरून फरार झाले. महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे. शहरात वाढत्या लूटप्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, पोलिसांनी आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# ठेकेदार झिबड यांना ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी

## अंजनसिंगी दलित वस्ती रस्ता घोटाळा?

**महासागर | प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.11 )–** अंजनसिंगी ग्रामपंचायतीच्या वार्ड क्रमांक 4 (दलित वस्ती) येथील रस्ता कामातील अनियमितता, भ्रष्टाचार आणि निकृष्ट दर्जामुळे प्रकरण चांगलेच गाजत आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कपिल पडघान यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता माहापात्रा यांच्याकडे या संदर्भात सविस्तर तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, दलित वस्ती सुधार योजनेतून मंजूर झालेल्या रु. 4 लाखांच्या रस्ता कामात निकृष्ट साहित्याचा वापर, अपूर्ण आणि दर्शनी काम, आराखड्याचे उल्लंघन,




चुकीचे लोकेशन, तसेच प्रत्यक्षात न झालेल्या कामांचे बिल काढल्याचे आरोप आहेत.

या गैरव्यवहारात ठेकेदार उमेश शालिकराम झिबड यांच्यासह सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांच्या संगनमताचा ठपका ठेवण्यात आला आहे. भ्रष्टाचार उघडकीस आणल्यानंतर तक्रारदाराला लाच देण्याचा प्रयत्न झाल्याचे ऑडिओ पुरावेही पडघान यांनी सादर केले आहेत. दलित वस्तीच्या नावावर सुरू असलेला भ्रष्टाचार थांबवण्यासाठी ठेकेदार झिबड यांना कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करणे आवश्यक आहे. तक्रारीत मागील 10 वर्षांतील ग्रामपंचायत कामांचे थर्ड पार्टी अंकेक्षण, झिबड यांच्या सर्व कामांची पुनर्तपासणी आणि दोषींवर एफआयआर नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात जिल्हा परिषद प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

> सदर कामाची तपासणी एसक्यूएफ मार्फत करण्याचे निर्देश दिले जातील. कामाच्या दर्जाबाबत तडजोड स्वीकारली जाणार नाही.
>
> **दिनेश गायकवाड, कार्यकारी अभियंता.**

# कापूस वेचणीदरम्यान महिलेचा हृदयविकाराने मृत्यू

**महासागर | प्रतिनिधी**

**तिवसा, ( दि.11 )–** तालुक्यातील फत्तेपूर जावरा येथील कापूस वेचणीदरम्यान 30 वर्षीय शेतमजूर पूनम अंकुश राऊत यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दु:खद घटना उघडकीस आली.

दुपारच्या विश्रांतीनंतर पतीसोबत परत कामावर गेलेल्या पूनम यांना अचानक श्वास घेण्यात



**फत्तेपूर येथील घटना**

अडचण निर्माण झाली आणि छातीत तीव्र वेदना जाणवू लागल्या. मजूर महिलांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना तातडीने तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेने राऊत कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. पूनम यांच्या पश्चात पती व सात वर्षांचा मुलगा आहे.

# समृध्द संत्राबागा बनल्या जळाऊ लाकडं

- चांदूरबाजार तालुक्यातील शेकडो हेक्टर संत्राबागांवर कुऱ्हाड
- बागायती नष्ट करुन पारंपारिक पिकाकडे शेतकऱ्यांचे पाऊल






**महासागर | प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.11 )–** पुर्वी संत्रा बागायतदार म्हटला की, सधन कास्तकार म्हणून त्याकडे पाहिले जायचे. देशातील उत्तम दर्जाच्या पळपिकांच्या रांगेत चांदूर बाजार तालुक्यातील संत्रा फळाचा नंबर कधीकाळी लागायचा. मात्र या समृध्द संत्राबागा आता जळाऊ लाकडापेक्षा जास्त नाही. तालुक्यातील शेकडो हेक्टर संत्रा बागांवर शेतकरी सर्रास कुऱ्हाड चालवून बागायती नष्ट करत आहे, आणि सोयाबीन, तूर, कापूस अश्या पारंपारिक पिकाकडे वळताना दिसत आहे.

संत्रावर दरवर्षी येत असलेले विविध व्हायरस, फळगळती, राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय बाजारात आर्थिक घसरगुंडी, उत्पादन खर्चातील प्रचंड वाढ आणि हवामान बदल अश्या विविध कारणांमूळे ही परिस्थिती आली आहे.दरवर्षी नवरात्रात भरघोस उत्पादनाने उठून दिसणाऱ्या या परिसरात आज मात्र संत्राबागांचे भयंकर उद्ध्वस्त चित्र दिसताहे. कित्येक वर्षे जपलेल्या झाडाचा खोड पडताना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारी वेदना त्यांच्या काळजाचे दोन भाग झाल्याचे स्पष्ट सांगून जाते.बाग टिकवायची इच्छा आहे; पण कर्जाचा वाढता डोंगर आणि कोसळलेले भाव, आता झाडतोडीशिवाय पर्याय नाही, अशी वेदनादायी कबुली अनेक शेतकरी देत आहेत. ही केवळ व्यक्तिगत हतबलता नसून विदर्भातील दारिद्र्य, प्रशासकीय दुर्लक्ष आणि कृषीव्यवस्थेतील खोलवरच्या समस्यांचे प्रतीक ठरताहे.

### घोषणा कागदांची सजावट

सरकारी घोषणा आजही कागदावरच्या सजावटीपेक्षा जास्त नाही. तर संत्राबागांची ओळख अक्षरश: धुळीत मिळत चालली आहे. एक संत्र्याचे झाड सक्षम उत्पादनासाठी तयार होईपर्यंत लागणारी वर्षांची साधना आणि लाखोंची गुंतवणूक—हे सर्व काही क्षणांत कुऱ्हाडीच्या फटक्याने संपत आहे. ही फक्त संत्रा बागांची नाही, तर 'ऑरेंज बेल्ट' म्हणून असलेली विदर्भाची ओळख संपत असल्याचे चित्र आहे. संत्र्यांची राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशावर 'संत्राविहीन भविष्या'ची सावली गडद होत आहे आणि या विदारक दृश्यासमोर संपूर्ण विदर्भ निऱ्शब्द उभा आहे.

# संकटं पाठ सोडत नसल्याने शेतकऱ्यांच्या परिश्रमाची माती!

## विभागीय आयुक्तांनी व्यक्त केला संवेदना | पानपिंपरी, केळींच्या शेतात दिली भेट

**प्रविण बोके**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.12 )–** विविध रोगांचे आक्रमण, निसर्गाचा लहरीपणा असे संकटं शेतकऱ्यांची पाठ सोडत नसल्याने शेतकऱ्यांच्या परिश्रमाची माती होत असल्याचा संवेदना विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी गुरुवारी (दि.11) व्यक्त केल्या. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पारंपारिक पिकं असलेले पान पिंपरी व केळी उत्पादकांच्या शेतात भेट दिल्यानंतर विविध कारणांनी पिकांचे झालेले नुकसान पाहून विभागीय आयुक्तांनी होत असलेल्या पिक नुकसानीचे कारणं जाणून घेतांना आपले शेतकऱ्यांविषयीचे भावनिक उद्गार काढले. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचा कार्यक्रम आपल्या नियोजित दौऱ्यात नसतांना किंवा कुणाचा



आग्रह नसताना श्वेता सिंघल यांनी स्वतऱ्हून काही शेतकऱ्यांच्या शेतात भेट दिली, आणि पिकांची परिस्थिती जाणून घेतली.

स्थानिक पत्रकारांशी संवाद साधताना शेतकऱ्यांच्या अडचणी, पिकांची स्थिती आणि उत्पादनातील अडथळे समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष शेतात जाण्याची इच्छा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी व्यक्त केली. विशेषत: पानपिंपरी पिकांबद्दल अधिक समजून घेण्याची उत्सुकता व्यक्त केल्यावर पत्रकारांनी त्यांना खोडगाव रोडवरील पानपिंपरी उत्पादक शेतकरी शारदा रवींद्र ताडे यांच्या शेतात नेले.

### महिला शेतकऱ्याची व्यथा ऐकली

शेतभेटीदरम्यान डॉ. सिंघल यांनी शारदा ताडे यांच्याकडून लागवड पद्धत, खर्च, एकरी उत्पादन आदींची सविस्तर माहिती घेतली. पानपिंपरी पिकाचा 'वेल'(व्हायरस) रोगामुळे झालेला नुकसानीकारक परिणाम प्रत्यक्ष पाहिला. यावेळी शेतकरी एवढी मेहनत करतो, पण रोग व निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे त्याला योग्य परतावा मिळत नाही, अशा शब्दांत त्यांनी खेद व्यक्त केला. त्यानंतर त्यांनी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या स्वत: शेतात जाऊन ऐकल्या. यावर्षी बाजारभाव न मिळाल्याने अनेकांनी केळी पाडून गहू पेरल्याचे सांगितल्यावर त्यांनी चिंता व्यक्त केली.

### अनपेक्षित भेट, आयुक्तांचा सन्मान

विभागीय आयुक्त अनपेक्षितपणे शेतात येऊन समस्यांची चौकशी करत असल्याने शेतकरी शारदा ताडे, सुलचना माकोडे, गोपाल माकोडे, गजानन माकोडे, प्रतीक्षा माकोडे, मच्छिंद्र येऊल यांनी आश्चर्य व्यक्त केले. भेट संपताच शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील 'हेट्याची फुले' देऊन आयुक्तांचा सन्मान केला, तर डॉ. सिंघल यांनीही ती फुले आनंदाने स्वीकारली. व्यस्त कार्यक्रम असूनही महिलाशेतकऱ्यांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेणारी ही भेट शेतकऱ्यांच्या मनात समाधानाची भावना निर्माण करणारी ठरली.

# बहिरम यात्रा दहा दिवसांवर; पिण्याच्या पाण्याचा प्रश्न 'जैसे थे'!

- मंजुरीला महिने उलटले, तरी कामाचा मागमूस नाही
- प्रशासनाच्या सुस्त कारभाराची पोलखोल

बादल डकरे

**चांदूर बाजार,( दि.11 )–** विदर्भातील सर्वाधिक कालावधीची बहिरम यात्रा अवघ्या दहा दिवसांवर आली असतानाही पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नात कोणतीही सुधारणा झालेली नाही. जिल्हा परिषद अमरावतीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने प्राथमिक सोयींकडे दुर्लक्ष केल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले असून यात्रेपूर्व तयारीतील कुचराई समोर आली आहे. दरवर्षी हजारो भाविकांचा ओघ वाढत असताना मूलभूत सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत, ही गंभीर बाब आहे.



वर्षभरापुर्वीच मिळाली मंजुरी

यात्रेत दरवर्षी भेडसावणारे पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी 15 डिसेंबर 2023 रोजी वाढीव पाईपलाईन, बोरवेल, हातपंप व जलवाहिनींसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव मान्य करून 2023–24 या वर्षासाठी सहा लाख रुपये मंजूर करण्यात आले. मात्र ऑक्टोबरमध्ये मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवातच झालेली नाही. निधीचा वापर कुठे अडकला आणि काम लांबणीवर का, याबाबत संभ्रम कायम आहे.

## लाखोंची कमाई, पण सुविधा रामभरोसे

दरवर्षी यात्रेतून मोठ्या प्रमाणावर महसूल जमा होतो; पण यात्रेतील सुविधा मात्र वर्षानुवर्षे ढासळत आहेत. पाण्यासाठी भाविक, दुकानदार व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. मंजुरी असूनही काम रखडून ठेवण्यामागे काही हितसंबंध तर नाहीत ना, असा संशय ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाची मागणी

यात्रा काही दिवसांवर असताना देखील पाणीपुरवठ्याबाबत ठोस उपाययोजना न झाल्याने नाराजी वाढली आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी सर्वत्र मागणी होत आहे. बहिरम यात्रेआधी पाण्यावाचून यात्रेकरूंना त्रास होऊ नये, हीच स्थानिकांची अपेक्षा.



पावसाळ्यात कारवर वृक्ष कोसळून झालेले नुकसान

# त्या वृक्षांच्या वाढलेल्या फांद्यांची कटाई!

## चौकशी अंती झाले स्पष्ट

महासागर | प्रतिनिधी

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.11 )– वन विभागाच्या सदनिका असलेल्या परिसरात तेथील रहिवासी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनीच वृक्षतोड केल्याचा आरोप झाला होता. याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीअंती त्या वृक्षांच्या वाढलेल्या फांद्यांची फक्त कटाई झाली असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



कटाई केलेले झाडं

परतवाडा येथे वनविभागाचे सदनिका (क्वार्टर) आहेत. या परिसरात मोठमोठे 20 ते 25 वर्ष जुने कडूनिंब, पिंपळ अश्या विविध प्रजातींचे वृक्ष आहेत. या झाडांच्या फांद्या मोठ्याप्रमाणात वाढलेल्या असल्याने पावसाळ्यात त्या फांद्या कोसळून विविध प्रकारची हानीसुध्दा या परिसरात झाली आहे.

वनविभागचे कर्मचारी वास्तव्यात असलेल्या सदनिकांवर सिमेंटच्या टीनाचे छत असल्याने या झाडाच्या फांद्या कोसळून अनेकवेळा हे छत क्षतीग्रस्त होतात. गेल्या पावसाळ्यात एका कारवर भले मोठे वृक्ष कोसळून कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या झाडांवर मोठ्या प्रमाणात माकडांचे झुंड हौदोस घालून तेथे राहत असलेल्या रहिवाश्यांकरिता धोका निर्माण करतात. माकडांच्या हल्ल्यांच्या अनेक घटनाही यापुर्वी येथे घडल्या आहेत. त्यामूळे उपाययोजना म्हणून येथील वृक्षांच्या अवास्तव वाढलेल्या फांद्यांची नुकतीच कटाई करण्यात आली. मात्र या कटाईला वृक्षतोडीचे स्वरुप देवून, येथे राहत असलेल्या कर्मचाऱ्यांना चौकशीच्या कचाट्यात अडकविण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणी वरिष्ठांनी केलेल्या चौकशीअंती येथे कोणतेच वृक्ष हे मूळातून तोडण्यात आले नाही. सर्व वृक्षांची कमीअधिक प्रमाणात कटाई करण्यात आली आहे. त्यामूळे चौकशीअंती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येथे राहत असलेल्या वनकर्मचाऱ्यांना क्लीनचीट देत त्यांना दिलासा दिला.

# गावात आठ दिवसांपासून पाण्याची कृत्रिम टंचाई

### ग्रामपंचायतीच्या निष्क्रीयतेमुळे नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.11 ) –** मागील आठ दिवसांपासून चुरणी गावातील पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक विहिरीवरील मोटर जळाल्याने व स्टार्टर खराब झाल्याने पाणीपुरवठा बंद पडला आहे. परिणामी गावातील नागरिकांना, विशेषतः महिलांना, पाण्यासाठी गावापासून दूर असलेल्या हातपंपावर जावे लागत असून मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हातपंपाचे पाणी ओढण्यासाठीही महिलांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेकांना इतर ठिकाणांहून पाणी आणण्याची वेळ येत असून, काही वेळा अशुद्ध पाणीही पिण्याची वेळ येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या



आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गावकऱ्यांनी ही समस्या सरपंच आणि ग्रामसेवकांना वारंवार कळवूनही कोणतीही तत्काळ कारवाई झाली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. गावातील नागरिकांनी वरिष्ठ प्रशासनाने तातडीने लक्ष घालून मोटर व स्टार्टर दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

# सत्यशोधक पद्धतीने विनाशुल्क लावणार विवाह

### सर्वशाखीय माळी समाज ऋणानुबंधचा उपक्रम 4 जानेवारीला

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.11 ) –** सर्वशाखीय माळी समाज ऋणानुबंधच्या वतीने महात्मा फुले प्रणित सत्यशोधक पद्धतीने विनाशुल्क विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती–जमातीसह सर्व प्रवर्गातील शेतकरी, शेतमजूर, आर्थिकदृष्ट्या मागास व दुर्बल घटकांतील उपवर युवक–युवती तसेच पुनर्विवाह इच्छुक विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित व विधुर यांना योग्य जोडीदाराची निवड करून त्यांचा विवाह रविवार, 4 जानेवारी 2026 रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे विनामूल्य लावून देण्यात येणार आहे.



निसर्गाची अवकृपा आणि शेतकरी–विरोधी धोरणांमुळे ग्रामीण कुटुंबांवर आर्थिक ताण वाढला असून, विवाहाचा मोठा खर्च करणे अनेकांसाठी अशक्य झाले आहे. ही परिस्थिती लक्षात घेत संस्थेच्या बैठकीत विनाशुल्क विवाह सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेने गेल्या 30 वर्षांपासून महात्मा फुलेंच्या सत्यशोधक तत्त्वांवर आधारित आंतरशाखीय, आंतरजातीय तसेच विधवा–विधुर पुनर्विवाहांना सातत्याने प्रोत्साहन देत अनेक विवाह संस्थेच्या खर्चातून पार पाडले आहेत. यावर्षीही त्याच सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबविण्यात येत असून इच्छुकांनी संयोजक प्रा. श्रीकृष्ण बनसोड (वऱ्हाड विकास, किशोर नगर, अमरावती) यांच्याशी 9763403748 / 8483904263 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मतदारसंघाला अधिवेशनातून मिळणार का विकासाचे गिफ्ट?

## आ.यावलकरांकडून ॲक्शन ची अपेक्षा

विलास पाटील

**वरुड,( दि.11 )–** वरुड–मोर्शी विधानसभा क्षेत्रातील मतदार अनेक वर्षांपासून संत्रा प्रक्रिया प्रकल्प, सिंचन सुविधा, शेतमजुरांचा कायम रोजगार आणि तरुणांसाठी रोजगारनिर्मिती या मूलभूत प्रश्नांशी झुंज देत आहेत. बदलांची अनेक वचने झाली; आमदार बदलले, घोषणा झाल्या—पण प्रत्यक्ष परिणाम अद्याप शून्य असल्याची भावना जनतेत तीव्र आहे. आता तरी बदल घडणार का?, मतदारसंघाला अधिवेशनातून विकासाचे गिफ्ट मिळणार का?, हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मतदारांचा एकच प्रश्न करत आहे.



संत्रा प्रक्रिया प्रकल्पाच्या प्रत्यक्ष उभारणी, सिंचनाचा प्रश्न, शेतमजुरांसाठी स्थिर रोजगार, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगारनिर्मितीचा आराखडा अश्या चार प्रमुख मुद्द्यांवर ठोस भूमिका घेण्याची अपेक्षा आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्याकडून व्यक्त केली जात आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना प्रक्रिया प्रकल्पाच्या अभावी मोठे नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे हा विषय अधिवेशनात प्राधान्याने मांडला जाणार का, याकडे विशेष लक्ष आहे. दुसरीकडे सिंचनाचा प्रश्न कायमच टोकदार असून पाण्याअभावी शेतकरी दरवर्षी हवालदिल होतात. शेतमजूर आणि तरुण बेरोजगारीही गंभीर स्थितीत आहे. या दोन्ही घटकांसाठी अद्याप स्पष्ट 'रोडमॅप'नसल्याने असंतोष वाढला आहे. आ.यावलकर अधिवेशनात काय मांडतात आणि शासन पुढे कोणते ठोस निर्णय घेते, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

# विहिगावातील वाळू तस्करी प्रकरणी विभागीय आयुक्तांची पाहणी

### आ.ज. मो. अभ्यंकर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नानंतर कारवाईला वेग

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.11 )–** तालुक्यातील विहिगाव येथील शहानूर नदीकाठावरील एक लाख चौरस फुटांहून अधिक जमिनीवरील कथित वाळू तस्करी तसेच गावातील खेळाचे मैदान संपुष्टात येण्याच्या धोक्याचा मुद्दा विधानभवनात गाजल्यानंतर, आज विभागीय आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. दिनांक ९ डिसेंबर रोजी विधान परिषद सदस्य आ. ज. मो. अभ्यंकर यांनी हा गंभीर विषय तारांकित प्रश्नातून उपस्थित केला होता.



आ. अभ्यंकर यांनी नदीकाठावरील वाळू तस्करीमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, जमिनीची वाढती घसरण आणि त्यामुळे खेळाचे मैदान धोक्यात येत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते. या प्रश्नाला उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने चौकशीची आवश्यकता मान्य करत 11 डिसेंबर रोजी विभागीय आयुक्तांकडून स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले होते. त्याअनुसार आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल विहिगाव येथे दाखल झाल्या.

त्यांच्या सोबत मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहोपात्रा, निवासी उपजिल्हाधिकारी काकडे, उपविभागीय अधिकारी (दर्यापूर) राजेश्वर हांडे, तहसीलदार पुष्पा सोळंके (डाबेराव), बीडीओ कल्पना जायभाये, रहिमापूर–चिंचोली पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनंत वडतकर, महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामस्थाचाही सुरक्षिततेवर प्रश्न

पथकाने नदीकाठावरील जमिनीचा ताबा, वाळू उपसाची स्थिती, खेळाच्या मैदानाची सद्य परिस्थिती आणि अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांची सखोल पाहणी केली. चौकशीदरम्यान ग्रामस्थांनीही वाळू तस्करीमुळे गावाच्या सुरक्षिततेवर निर्माण झालेल्या संकटाबाबत तक्रारी मांडल्या. या प्रकरणाला गती विधान परिषदेत उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्नामुळे मिळाली असून, विभागीय आयुक्तांचा सविस्तर अहवाल महसूल विभागाकडे लवकरच सादर होणार आहे. दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मेळघाटातील हजारो मजुरांचे रोजगारासाठी स्थलांतर

### स्थानिक रोजगाराचा गंभीर प्रश्न

### आदिवासी समाज अनेक अडचणीत

### हिवाळी अधिवेशनात मेळघाटवर दुर्लक्ष

मारोती पाटणकर

**चुरणी, ( दि.11 )–** मेळघाटातील चिखलदरा व धारणी या दुर्गम डोंगराळ भागांत रोजगाराचा प्रश्न अनेक वर्षांपासून गंभीरच आहे. परिसरातील मर्यादित शेती, उद्योगधंद्यांचा अभाव आणि पावसाळ्यानंतर शेतीकामे पूर्ण होण्यामुळे येथे बहुतांश आदिवासी बांधवांच्या हाताला काम राहत नाही. रब्बी हंगाम अत्यल्प असल्याने खरीपानंतर मजुरांना काम मिळत नाही आणि दिवाळीनंतर ही कुटुंबे रोजगाराच्या शोधात जिल्ह्याबाहेर, राज्याबाहेर स्थलांतरित होतात. हे प्रश्न वर्षोगणती दुर्लक्षित राहत असून हिवाळी अधिवेशनातही या मुद्दयांना सरकारकडून पाठ दाखविली जात आहे. सध्या मेळघाटातील अनेक गावे रिकामी झाली असून हजारो मजूर उसतोडीसह विविध कष्टप्रद कामांसाठी महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत गेले आहेत. स्थलांतरामुळे त्यांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम होत असून रोजगाराचा कायमस्वरूपी प्रश्न आजही 'जैसे थे'आहे.



**मेळघाटातील रोजगार स्थिती ( शासन आकडेवारी )**

| | |
|---|---|
| चिखलदरा व धारणी तालुक्यांत सक्रिय मजूर | 1,28,900 |
| विविध यंत्रणेमार्फत रोजगार मिळालेले मजूर | 29,737 |
| सध्या सुरू असलेली कामे | 1,315 |

## स्थलांतर आणि शिक्षणाचा प्रश्न

स्थलांतरामुळे आदिवासी कुटुंबांमधील मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. घरी मुलांना सांभाळणारे कोणी नसल्याने अनेक कुटुंबे त्यांना सोबत घेऊन जातात, ज्यामूळे मुलांचे शिक्षण थांबते. स्थलांतरित कुटुंबांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही वारंवार समोर येतो. याखेरीज बाहेरील वातावरणात तंबाखू, गुटखा, नशाव्यसनाची सवय लागण्याचे प्रमाण वाढत असून आदिवासींच्या आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. या समस्या टाळण्यासाठी मेळघाटातच मोठे उद्योग, रोजगारनिर्मिती केंद्र उभारावीत, अशी नागरिकांची मागणी आहे.

# डोंगराएवढी चोरी, वारुळाएवढी वसुली!

### महावितरणच्या 'थेफ्ट ड्राईव्ह'वर प्रश्नचिन्ह



महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि.11 )–** महावितरणकडून दरमहा 'थेफ्ट ड्राईव्ह'अंतर्गत वीजचोरीविरोधात मोहिमा राबविल्या जातात. कागदोपत्री या कारवाईत मोठी प्रकरणे उघडकीस आल्याचे दर्शविले जाते. मात्र, प्रत्यक्षात चोरी प्रकरणांची संख्या वाढत असताना संबंधित दंड व वसुली मात्र अत्यल्प असल्याने या मोहिमेची प्रभावीता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. स्थानिक वर्तुळात डोंगराएवढी चोरी, वारुळाएवढी वसुली अशी चर्चा रंगू लागली आहे.

उपविभागातील तपासणीत अनधिकृत जुळणी, मीटर बायपास, थेट वायरिंग यांसारख्या अनेक गैरप्रकारांचा उलगडा होत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. पण एवढ्या प्रकरणांनंतरही वसूल होणारी आर्थिक दंडरक्कम अगदीच नगण्य आहे. त्यामुळे कारवाई प्रत्यक्षात कितपत योग्य प्रकारे नोंदवली जाते, की फक्त आकडे फुगवण्यासाठी कागदोपत्री कार्यवाहीचा आभास निर्माण केला जातो, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

## 'ड्राईव्ह'की 'ड्रामा'?

चोरीचे प्रमाण मोठे असेल तर दंडही तितकाच मोठा असायला हवा. पण इथे उलट चित्र—चोरी मोठी दाखवतात, दंड मात्र किरकोळ! अशा प्रतिक्रिया वारंवार ऐकू येतात. काही कर्मचाऱ्यांच्या अनौपचारिक चर्चेनुसार, चेकर पथकाने प्रकरण नोंदवले तरी त्यानंतरची वसुली प्रक्रिया प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे चोरी रोखण्याऐवजी ती वाढीस लागल्याचे मानले जात आहे, त्यामूळे हा ड्राईव्ह आहे की, ड्रामा हेच कळत नाही.

## खर्च–उत्पन्न ताळेबंद विस्कळीत

मोठी पथके, वाहनव्यवस्था, अधिकारी, पंचनामा, पोलीस मदत – या सर्वांवर लाखोंचा खर्च केला जातो. मात्र त्यातून मिळणारी दंडरक्कम खर्चाच्या तुलनेत अत्यल्प ठरत असल्याने ही मोहीम चालू ठेवावी की धोरणात बदल करावा, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोर्शी विभागाच्या कार्यक्षेत्रातील चांदूर बाजार उपविभागात चोरी प्रकरणांतील आकडेवारी आणि वसुलीतील तफावत लक्ष वेधून घेत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची कामगिरी, कारवाईची पारदर्शकता आणि विभागीय प्रामाणिकतेबाबत नागरिकांमध्ये शंका निर्माण झाली आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ ते समाधी स्थळापर्यंत

# नवीन रस्ता निर्मितीस मान्यता

### तुळापूर व मौजे वढू बु. विकास आराखडा शिखर समिती बैठक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे पुणे जिल्ह्यातील बलिदान स्थळ तुळापूर (ता. हवेली) व समाधी स्थळ मौजे वढू बुद्रुक (ता. शिरूर) दरम्यान नवीन रस्त्याची निर्मिती व भीमा नदीवरील पूल विकासकामांचा अंतर्भाव असलेल्या 532.51 कोटी किमतीच्या विकास आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहे. या दैवताचे बलिदान स्थळ असलेल्या तुळापूर आणि समाधी स्थळ असलेल्या वढू बुद्रुक येथील विकास आराखडा राबविताना ग्रामस्थांच्या सूचना लक्षात घ्याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार ज्ञानेश्वर कटके उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान आणि समाधीस्थळाला नमन करण्यासाठी तुळापूर आणि वढू बुद्रुक येथे मोठ्या प्रमाणावर नागरिक येत आहेत. त्यामुळे तुळापूर - वढू बु. रस्ता भीमा नदीवरील पुलाद्वारे जोडण्यात यावा.

सध्या 14 किलोमीटरचा रस्ता असून नागरिकांना तुळापूरहून वढू बुद्रुक येते येण्यासाठी 30 ते 40 मिनिटांचा कालावधी लागतो. भीमा नदीवरील पूल केल्याने हा रस्ता साडेसहा किलोमीटरचा होईल. त्यामुळे दोन्ही स्थळांमधील अंतर कमी होऊन नागरिकांचा वेळ वाचेल.

भीमा नदीवरील हा पूल 'व्हिवींग गॅलरी'सह असावा. पुलाची रचना छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील इतिहासाची आठवण करून देणारी असावी. पूल दर्जेदार निर्मित करून नदीच्या घाटाचे कामही इतिहासाची आठवण करून देणारे असावे. नदी घाट आणि पुलावर प्रकाश योजना आणि सौंदर्यीकरण दर्जेदार असण्याबरोबर या ठिकाणी गाईडना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना संपूर्ण ऐतिहासिक संदर्भांची माहिती असावी.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासाची आठवण येथे येणाऱ्या प्रत्येकाला व्हावी, अशा पद्धतीने विकास कामे करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, भीमा नदीवरील पुलाची रुंदी वाहतुकीला पर्याप्त असावी. पूल आणि व्हिविंग गॅलरी येथे येणाऱ्या प्रत्येकाने बघावी, अशा पद्धतीने निर्मित करावी. प्रस्तावित तुळापूर ते वढू बुद्रुक रस्त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करावी. छत्रपती संभाजी महाराजांवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाला येथे महाराजांचा इतिहास जाणून घेण्यासाठी पुन्हा येण्याची इच्छा होईल, अशा पद्धतीने विकास करावा.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय आदी उपस्थित होते. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी बैठकीत सादरीकरण केले. दूरदृश्य प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार उपस्थित होते.

**थोडक्यात विकास आराखडा**

स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या तुळापूर बलिदान स्थळी संग्रहालय, 82 आसनी क्षमतेचा 10 डी शो सभागृह, प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, 350 मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृह यांची कामे सुरू आहेत.

समाधी स्थळ वढू बु येथे संग्रहालय, प्रशासकीय इमारत, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, १२० मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृहाची कामे सुरू आहेत.

## महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य

### राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत ५४ सामंजस्य करार




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
राज्याने पंप स्टोरेजमध्ये ७६,११५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेपर्यंत मजल मारली आहे.महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य असून महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रकल्पांच्या उभारणीसाठी झालेल्या करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार आहे. या प्रकल्पात २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११,५०० रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प, कोयना टप्पा- ६ उदंचन जलविद्युत प्रकल्प आणि सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी जलसंपदा विभाग आणि जेएसडब्लू निओ एनर्जी लि., महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

या कार्यक्रमास जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण खोरे) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार सुरेश खाडे, आमदार नरेंद्र मेहता, आमदार चित्रा वाघ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पंप स्टोरेज क्षमतेच्या दृष्टीने देशात आघाडीवर आहे. आपल्याकडे पश्चिम घाट आणि मोठ्या धरणांची प्रणाली असल्याने पंप स्टोरेजसाठी अत्यंत अनुकूल पर्यावरण उपलब्ध आहे. केंद्र शासनाचे यात सहकार्य मिळत असून या प्रकल्पांना गती मिळणार आहे. नवीकरणीय ऊर्जेतील अस्थिरता संतुलित करण्यासाठी पंप स्टोरेज प्रकल्प मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणार आहे. कमीत कमी वेळेत प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करतील.

राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण ५४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे ७६ हजार ११५ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. त्यामुळे रुपये ४.०६ लाख कोटी इतकी गुंतवणूक व १.२५ लाख मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## एकनाथ खडसेंच्या अडचणी वाढल्या

### भोसरी जमीन प्रकरणात दोषमुक्ततेचा अर्ज न्यायालयाने फेटाळला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
भोसरी जमीन घोटाळा प्रकरण पुन्हा एकदा गाजू लागले आहे. राज्याचे माजी महसूल मंत्री एकनाथ खडसे यांना या प्रकरणात मोठा धक्का बसला असून, मुंबई सत्र न्यायालयाने त्यांचा दोषमुक्ततेसाठी दाखल केलेला अर्ज फेटाळला आहे.

महसूल मंत्री म्हणून कामकाज पाहताना त्यांनी आपल्या पदाचा वापर करून अनुचित लाभ घेतला असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. याचबरोबर त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांनीही दोषमुक्ततेसाठी केलेले अर्ज विशेष न्यायालयाने निकाली काढल्यामुळे तिन्ही जणांवर आता आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रकरणाची गंभीरता पुन्हा वाढली असून पुढील सुनावणीला सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुण्यातील भोसरी एमआयडीसी परिसरातील जमिनीची खरेदी-विक्री प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करत, खडसे यांच्यावर काही वर्षांपूर्वी आरोप करण्यात आले होते.

या जमिनीचा सरकारी दरापेक्षा खूपच कमी किमतीत व्यवहार करण्यात आल्याचे नमूद करून ईडीने एकनाथ खडसे यांना अनेक वेळा समन्सही बजावले होते. त्यांच्याविरुद्ध ईसीआयआर नोंदवण्यात आला होता आणि पुढे ईडीने खडसे, त्यांची पत्नी तसेच जावई गिरीश चौधरीबरोबरच काही अन्य व्यक्तींचेही नाव असलेले आरोपपत्र दाखल केले होते.

या कारवाईनंतर खडसे यांनी जामिनाची तरतूद मिळवली होती, परंतु आरोप पूर्णपणे रद्द करण्यासाठी त्यांनी मुंबई सत्र न्यायालयात स्वतंत्र अर्ज दाखल केला होता. या अर्जावर नुकतीच सुनावणी झाली असून न्यायालयाने हा अर्ज ग्राह्य धरला नाही.

## ईडी आणि एटीएसची छापेमारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
राष्ट्रीय तपास यंत्रणा तसेच एटीएस आणि ईडीच्या पथकांनी भिवंडी तालुक्यातील पडघाच्या जवळ असलेल्या बोरिवली गावात बुधवारी रात्रीपासूनच छापेमारीला सुरुवात केली आहे. दहशतवादी कृत्यांसाठी आर्थिक मदत पुरवल्याप्रकरणी ईडी आणि एटीएसच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली असल्याचे समजते. या तिन्ही पथकांच्या अधिकाऱ्यांनी बोरिवलीमधील काही घरांवर पहाटेच्या सुमारास छापेमारी करत कारवाई केली.

**टेरर फंडिंगच्या पार्श्वभूमीवर मोठी कारवाइ**

दहशतवादी कारवायांचे केंद्र म्हणून कुप्रसिद्ध ठरलेल्या भिवंडीतील पडघा-बोरिवली गावावर पुन्हा एकदा तपास यंत्रणांनी आपली वक्रदृष्टी वळवली आहे. कुख्यात दहशतवादी साकिब नाचण याच्या मृत्यूनंतर शांत भासणाऱ्या या गावात, गुरुवारी रात्री एटीएस आणि ईडी यांनी संयुक्तरीत्या मोठी कारवाई केली. दहशतवादी कृत्यांना होणारा आर्थिक पुरवठा रोखण्यासाठी ही छापेमारी करण्यात आल्याने परिसरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

पडघ्याला लागून असलेल्या बोरिवली गावात गुरुवारी रात्रीपासूनच तपास यंत्रणांनी धडक दिली आहे. ही कारवाई प्रामुख्याने दहशतवादी कृत्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या निधीच्या तपासाशी संबंधित आहे.

ईडीच्या अधिकाऱ्यांनी संशयास्पद आर्थिक व्यवहारांची कसून चौकशी सुरू केली असून, त्यांना एटीएसकडून स्थानिक मदत पुरवली जात आहे. या कारवाईत अनेक संशयितांच्या घरांची झडती घेण्यात आली असून, काही महत्त्वपूर्ण धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दोन वर्षांपूर्वी याच गावातून साकिब नाचण, त्याचा मुलगा आणि इतर साथीदारांसह एकूण 17 जणांना अटक करण्यात आली होती. त्यावेळी समोर आलेली माहिती अत्यंत धक्कादायक होती. साकिब नाचण याने बोरिवली गावाला भारतापासून वेगळे करत द्यअल शामह्न हा स्वतंत्र इस्लामिक देश घोषित केले होते. इतकेच नव्हे, तर या कथित देशासाठी त्याने स्वतःची वेगळी राज्यघटना आणि मंत्रिमंडळही तयार केल्याचा आरोप होता.

साकिब नाचण याचा २८ जून रोजी कारागृहात मृत्यू झाला होता. त्याच्या मृत्यूनंतर गावातील हालचाली काहीशा थंडावल्याचे चित्र होते. मात्र, आता केंद्रीय तपास यंत्रणांनी पुन्हा एकदा बोरिवलीत एन्ट्री केल्याने, जुन्या प्रकरणाचे धागेदोरे अजूनही खोलवर रुजले असल्याची शंका आहे. सध्या गावात तगडा पोलिस बंदोबस्त असून, कोणाकोणाची चौकशी होणार आणि यातून काय स्फोटक माहिती समोर येणार, याकडे लक्ष लागले आहे.

## आमदार, खासदारांच्या घरात बिबटे शिरायला हवे

### माजी आमदार बच्चू कडू यांचा संताप : हे सरकार 'जाऊ तिथे खाऊ'चे



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ११ :
माजी आमदार बच्चू कडू यांनी गुरूवारी बिबट्याच्या मुद्यावरून सरकारवर टीकेची तोफ डागली. हे सरकार हजार बिबट्यांचा बंदोबस्त करू शकत नाही. हे सरकार जाऊ तिथे खाऊंचे आहे. त्यामुळे आमदार, खासदार व मंत्र्यांच्या घरात बिबट्या शिरला तर त्यांना सामान्यांचे दुःख समजेल, असे ते म्हणालेत.

राज्यात सध्या बिबट्यांचा प्रश्न चांगलाच गाजत आहे. अनेक शहरे व गावांत बिबट्यांनी हैदोस घातला असून, त्यात अनेकजण जखमी झालेत. या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी सरकारवर वरील टीका केली आहे. ते म्हणाले, हे सरकार जाऊ तिथे खाऊ धोरणाचे आहे. ते जंगलात 200 शेळ्या सोडतील आणि 1000 शेळ्या सोडल्याचे सांगतील. सर्वसामान्य नागरीक बिबट्यांच्या वावरामुळे त्रस्त झाला आहे. पण सरकार त्यावर काहीच करत नाही. आता हे बिबटे आमदार, खासदारांच्या घरात शिरले पाहिजे. त्यानंतर त्यांना जनतेचा त्रास समजेल. दरवर्षी बिबट्याच्या हल्ल्यात 400-500 लोक मरतात. पण सरकारला सोयरसुतक नाही.

ते पुढे म्हणाले, सरकारला चालू वर्षाची कर्जमाफी करावीच लागेल. कर्जमाफी योग्य पद्धतीने केली नाही, तर विदर्भात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात रेल्वेची चाके फिरणार नाहीत. मी प्रवीण परदेशी यांना कर्जमाफीसाठी मध्यवर्ती बँकेची बैठक घेण्याची विनंती केली. आम्ही सांगितले म्हणून त्यांनी बैठक लावली. हे परदेशी म्हणजे पूर्ण परदेशी आहेत. ते देशातले आहेत की नाही हे तपासले पाहिजे.

**तपोवनातील वृक्षतोडीला विरोध**

बच्चू कडू यांनी यावेळी नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीवरही भाष्य केले. आमचा वृक्षतोडीला विरोध करणाऱ्यांना पाठिंबा आहे. गरज भासली तर मी स्वतः तिथे जाऊन सरकार झाडे कसे तोडणार हे बघेन. संत तुकारामांनी झाडांवर अभंग लिहिले. पण हे सरकार वृक्षतोड करून साधूसंतांचा अपमान करत आहे. यांना सत्ता व पैसा याची मस्ती आली आहे, असे ते म्हणाले.

बच्चू कडू यांनी यावेळी ईव्हीएममध्ये 15 ते 20 टक्के घोळ असल्याचाही संशय व्यक्त केला. 15 ते 20 टक्के मतदान यंत्रांत घोळ आहे. एक मेहता नावाचे गृहस्थ आहेत. राज ठाकरेंनीही मतचोरी कशा पद्धतीने होते हे सांगितले आहे. माझे चिन्ह बॅट असेल तर बॅट दिसेल, पण नंतर त्याचे कमळात रुपांतर होते. त्यामुळे ईव्हीएमचा वापर कायमचा बंद झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

## राज्यस्तरीय मानसोपचार तज्ज्ञ परिषद

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ११ :
मानसोपचार विषयावर अक्षर मानव कडून भिकोबा तांबे सभागृह बारामती, जिल्हा पुणे येथे दि. १३, १४ डिसेंबर २०२५ रोजी राज्य स्तरीय मानसोपचार परिषदचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत सर्वांना मोफत प्रवेश आहे, अशी माहिती अक्षर मानवचे राज्य संघटक तथा विदभार्चे संचालक आझाद जमा खान यांनी अमरावती येथे दिली.

मानसोपचार ही आता माणसांची नेहमीची गरज आहे. जगाचा आणि जगण्याचा बदललेला ढाचा ही गोष्ट माणसाला अस्वस्थ करते, घाबरवते, त्या माणसाच्या मनावर परिणाम होतो आणि माणसाचं मानसिक स्वास्थ्य हरवतं, त्यातून त्याच्या शारीरिक, कौटुंबिक, सामाजिक स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतात.

आता मानसोपचाराची गरज असलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. आणि त्यांच्यासाठी आता मानसोपचार तज्ञही उपलब्ध होऊ लागले आहेत. पण हा सर्व प्रकारच अजूनही लोकांना नवा आहे. समाज या विषयावर अजूनही चाचपडतो आहे. माणसाला मानसिक दृष्ट्या अस्वस्थ करत असल्यामुळें मानसोपचाराची गरज असलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर मानसोपचार तज्ज्ञांनी ऐकत्र येऊन आपापसात व्यापक चर्चा करावी. मानसोपचार क्षेत्रातले आपण आणि आपला व्यवसाय व समाज या मुख्य विषयाला घेऊन सर्व समस्यांवर विचार विनिमय करून पुढील दिशा ठरवावी या उद्देशाने या परिषदेचे दोन दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अमरावतीच्या जिल्हा सचिव अश्विनी वितोंडे-खान यांनी सुद्धा दिली.

या परिषदेत कादंबरीकार राजन खान सहित महाराष्ट्रातील अनेक मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक सल्लागार उपस्थित राहुन नागरिकांना मार्गदर्शन करणार आहे. परिषदेच्या विचार पिठावर आपले विचार मांडण्याची प्रत्येकाला संधी मिळेल. या परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्राच्या सीमेवर गुजरातची घुसखोरी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही राज्यांच्या सीमारेषेवरील जुना वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. तलासरी तालुक्याच्या वेवजी, गिरगाव, घीमाणीया, झाई, संभा आणि अच्छाड या ग्रामपंचायतींच्या सीमाविषयक मुद्द्यांमुळे तणाव निर्माण झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न अलीकडे अतिक्रमणाच्या वाढत्या घटनांमुळे अधिक तीव्र झाला आहे.

तलासरी तालुक्यातील वेवजी गाव व उंबरगाव तालुक्यातील सोलसुंभा या भागांच्या सीमारेषा स्पष्ट न ठरल्याने दोन्ही राज्यांच्या नागरिकांमध्ये तणाव निर्माण होत असून, वारंवार वादाचे प्रसंग घडत आहेत. त्यामुळे स्थानिकांनी राज्य सरकारकडे हद्दनिश्चितीची ठोस मागणी पुन्हा पुढे सरकवली आहे.

या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत दोन्ही राज्यांच्या महसूल यंत्रणांनी एकत्र येऊन सीमारेषेची प्रत्यक्ष तांत्रिक मोजणी करण्याचा प्रयत्न केला. पालघर जिल्ह्यातील तलासरी तहसीलदार आणि गुजरातमधील उंबरगाव तहसीलदार यांच्या उपस्थितीत काल मोजणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, ही मोहीम स्थानिक नागरिक आणि उपसरपंचांच्या आक्षेपांमुळे अडखळली.

नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकांमुळे संपूर्ण मोजणी तात्पुरती स्थगित करण्याची वेळ आली. हद्दनिश्चिती योग्यरीत्या न झाल्याने वेवजी गावातील सर्वे नंबर 204 व सोलसुंभा गावातील सर्वे नंबर 173 यावर दोन वेगवेगळ्या राज्यांचा दावा असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या दोन भूखंडांवरील सीमावाद हा संपूर्ण प्रक्रियेतील सर्वाधिक गुंतागुंतीचा मुद्दा ठरला आहे. हद्द अस्पष्ट असल्याने अनेक अनधिकृत बांधकामांनाही उधाण आले असून विशेषतः वेवजी गावात गुजरात राज्यातील विविध इमारती उभ्या राहत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.



## मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवोत्सव - २०२६ निमित्त मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, निबंध लेखनाचे विषय पुढील प्रमाणे आहेत.

शिवरायांचे दुर्गविज्ञान, आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज, शिवरायांची युद्धनीती, हिंदूधर्मरक्षक शिवराय,शिवरायांचे बालपण असे आहेत. मोडी लिपीतील निबंधाचे देवनागरीतील लिप्यंतर देखील ठेवावे. forms.gle/mCj1XriJ1BsWHScR6 गूगल फॉर्म मध्ये निबंध उपलोड करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी पंकज भोसले - 9821009137 किंवा अमित घाटये - 9833691856 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे



## आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी बृहत आराखडा तयार करा

### आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश : बांधकामाधिन रुग्णालयांच्या इमारत कामांची आढावा बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
राज्यात लोकसंख्यानिहाय आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयापर्यंत बळकटीकरणावर भर देत दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी राज्याच्या बृहत आराखडा तयार करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

विधान भवन येथे समिती कक्षात आरोग्य विभागाच्या बांधकामाधीन इमारतींचा आढावा बैठकीत आरोग्यमंत्री आबिटकर बोलत होते.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात उभारण्यात आलेल्या आरोग्य संस्थांच्या इमारतींचा रुग्णसेवेत उपयोग करावा. मागणीप्रमाणे आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यात यावे. आरोग्य संस्थांच्या इमारतींची अंदाजपत्रके तपासून घेण्यात यावीत. रुग्णालयांमध्ये स्वच्छता, रुग्णांना मिळणार आहार आणि मनुष्यबळ याबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही. स्वच्छतेबाबत कटाक्षाने कारवाई करावी. स्वच्छतेच्या कामासाठी नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावे. कामात व्यत्यय आणून काम बंद पाडणाऱ्या तसेच कामात कुचराई करीत असलेल्या कंत्राटदारांना काळे यादीत टाकावे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिले.



ठाणे सामान्य रुग्णालयाचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करून रुग्णालय रुग्णसेवेत रुजू करण्याचे निर्देशही आरोग्य मंत्री यांनी दिले.

बैठकीत संगमनेर (जि. नगर) येथील स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिवती ग्रामीण रुग्णालय (जि. चंद्रपूर), डागा रुग्णालय नागपूर, उमरेड उपजिल्हा रुग्णालय , प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसी ता. उमरेड, प्राथमिक आरोग्य केंद्र नांद ता भिवापूर, कुही (जि नागपूर) ग्रामीण रुग्णालय, धाराशिव जिल्हा रुग्णालय, मलकापूर (ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालय, पालघर जिल्ह्यातील मनोर ट्रॉमा केअर आणि अन्य रुग्णालयांचा कामांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी आमदार विनय कोरे, प्रवीण दटके, कैलास पाटील, संजय मेश्राम, विलास तरे, आमदार देवराव भोंगळे, अमोल खताळ, शांताराम मोरे यांच्यासह संचालक डॉ नितीन अंबाडेकर, सहसंचालक श्री कंदेवाड यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

